# ।। बेली ग्रंथ ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## || अथ बेली ग्रंथ लिखंते ||

|| चोपाई ||

**सब संतन सुं बीनती || लुळ लुळ लागे पाय ||**
**परा परमपद मोख हे || दीजो भेव बताय ||१||**

सर्व परमपद मोक्ष प्राप्त केलेल्या संतांच्या चरणावर मी झुकून-झुकून वारंवार विनंती करतो की,जे विना दु:खाचे म्हणजे त्रिगुणीमाया तसेच होणकाळाच्या पलिकडील महासुखाचे परमपद आहे अशा मोक्षपदाला घटात प्रगट करण्याचा भेद मला सांगा. ||१||

**भरम करम का अेक सही || मेटो सबे जंजाळ ||**
**नेहचळ निरभे ग्यान दो || कर्म न झाँपे काळ ||२||**


माझे सर्व भ्रम म्हणजे त्रिगुणी मायेचे सर्व छोटे मोठे नाशवान सुख श्रेष्ठ व सत्य वाटणे तसेच या सुखांना देणारे काळाचा ग्रास बनलेले मायावी ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती व अवतारांसारखे शुभकर्मी देवत आणि भैरु,मुंजोबा,पीरोबा,सितला,दुर्गासारखे अशुभ अशुभ कर्मी देवता,श्रेष्ठ व सत्य वाटणे आणि हे देवी देवता प्रसन्न होण्याकरीता जप,तप,यज्ञ, हटयोग,सांख्ययोग,नवविद्या भक्ती,ओअमची भक्ती,दुर्गा सितला आदिची भक्ती भेरु, भोपाची भक्ती,खेतपालची भक्ती हे सर्व कर्म क्रिया आवश्यक वाटणे असा माझा भ्रम आणि कर्मांचा जंजाळ नाश होईल असे ज्ञान मला देऊन माझे सर्व भ्रम व कर्मांचा जंजाळ पूर्णत: मिटवून द्या.मला जेथे कर्म लागणार नाही .म्हणजे काळ ग्रासणार नाही अशा निश्चल भयरहीत निर्भय देशाच्या ज्ञानाचा भेद द्या.||२||

**किरपा कर गुरदेवजी || दीया भेव बताय ||**
**परमपद प्रकासिया || उर अंतर मध माय ||३||**

सतगुरु महाराजांनी कृपा करुन जेथे कर्म लागणार नाही,काळ ग्रासणार नाही अशा परमपद मोक्षाचा भेद मला दिला.सतगुरु महाराजांच्या भेदाने माझ्या हृदयात भ्रम कर्माचा जो अंधार होता तो मिटून गेला आणि परमपदाचा प्रकाशा होऊन गेला. ||३||

**नाम निरंजण राम रस || पी पी हुवा उजास ||**
**सपत दीप नव खण्ड में || किया गिगन में बास ||४||**

सतगुरु महाराजांच्या भेदाने मायेच्या पलिकडे निरंजन राम नामाचा रस पिऊन-पिऊन




माझ्या अंतरात परममोक्षाचा उजेड झाला आणि मी त्रिगुणी मायेचे सात द्विप(जंबु,पुलस्त,शालमली,क्रुस,क्रौंच,शाक,पुष्कर)आणि नऊ खंड त्यागून सात द्विप,नऊ खंडाच्या पलिकडे सतस्वरुप गगनात जाऊन वास केला. ||४||

**चहुँ दिस चमके दामणी ।। बीज हळाहळ होय ।।**
**सूरज बोहोत प्रकाशिया ।। जुग सूज्या सब मोय ।।५।।**

जसे घोर अंधाऱ्या ढगांच्या रात्रीमध्ये रस्त्यामध्ये जग जराही सुचत नाही आणि अशा भारी अंधाऱ्यात हळूहळू वीज चमकते वा दाट काळ्या ढगांमुळे जग सुचत नाही अशा दाट काळ्या ढगांना कापून सुर्य पूर्ण प्रकाशतो आणि पूर्ण जग दिसते.याप्रकारे मला मायेच्याच सुखामध्ये काळाचे दु:ख कसे ओतप्रोत भरले आहे.आणि जगातील स्त्री–पुरुष कसे दु:खात पडले आहे हे दिसत आहे. ।।५।।

**अेसी अब बातां हुवे ।। सुणज्यो सब संसार ।।**
**पारब्रम्ह परमात्मा ।। सो जस बारम्बार ।।६।।**

सतगुरुच्या भेदाने पारब्रम्ह परमात्मा प्रगट झाल्याने माझ्यात मायेचे सुख कसे खोटे आहेत.काळ कसा जुलमी आहे आणि पारब्रम्ह परमात्मा कसा सुख देणारा दयाळू आहे.ह्या गोष्टी सहजमध्ये ज्ञानाने सुचत आहे.याकरीता माझा पारब्रम्ह परमात्म्याला वारंवार प्रणाम आहे आणि ह्या गोष्टी जे जे सतगुरुचा भेद घेऊन पारब्रम्ह परमात्म्याचे रामनाम रस पितील त्या सर्वांना होईल हे सर्व संसाराचे स्त्री–पुरुष समजा.।।६।।

**दिन दिन निरमल अधिक हे ।। दिन दिन निरबला होय ।।**
**परमपद पर मोख में ।। बिरला समझे कोय ।।७।।**

माझ्या घटात पारब्रम्ह परमात्मा प्रगट झाल्याकारणाने माझे ह्रदय मन आणि ५ आत्म्यांच्या वासनांनी पूर्ण मलीन झाले होते ते दिवसें न दिवस वासनांपासून मुक्त होऊन निर्मल होत आहे आणि मन आणि ५ आत्मांच्या विकारांच्या बळाने त्रिगुणी मायेमध्ये झोबून काळाच्या मुखात टाकत होते ते ही बळ त्याचे दिवसें दिवस घटून राहीले.असा पारब्रम्ह परमात्मा प्रगट झाल्यावर प्राप्त होणाऱ्या मोक्षाच्या परमपदाला कोणी एखादाच(बिरला)समजतो. ।।७।।

**सो सत्त साहिब साईयाँ ।। लीला बोहोत अनेक ।।**
**घट घट भीतर राम ही ।। आद अंत मद अेक ।।८।।**

काल ही होता,आज ही आहे,उद्या ही राहणार अशी कोणती वेळ नव्हती की,तो नव्हता असा सतसाहेब जो मायेसारखा जो काल होता तर आज नाही आणि आज आहे तर उद्या नाही.असा असत्य नाही.त्याची जीवांना तृप्त सुख देण्याच्या लीला मायेपेक्षा वेगळ्या आणि खुप तसेच अनेक प्रकारच्या आहेत.तो एक पारब्रम्ह परमात्मा राम जीवाला सुख देण्याकरीता घटा घटात आधी ही होता,आज ही आहे आणि शेवटी ही राहतो अशी त्याची लीला आहे.या लीलेला कोणी एखादाच समजतो. ।।८।।

**परापरी परमात्मा ।। प्रमल बास सुवास ।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**सुर नर मुनि देव सब ।। करे सकळ जुग आस ।।९।।**

जसे फुलातून उगवलेला सुवास सर्वांना आनंद देतो तसा परात्परी परमात्मा आधी पासून सर्वांना सुखच देत आहेत.याकरीता सर्व देव देवता जगातील सर्व स्त्री–पुरुष अशा सुख देवाल(सुख देणाऱ्या)परमात्म्याची घटात प्रगट होण्याची आशा करतात. ।।९।।

**ब्रम्हा बेठा ध्यान धर ।। अंतर रया समाय ।।**
**तो गत तो गत सांईयाँ ।। यूं भजतां दिन जाय ।।१०।।**

ब्रम्हा तो पारब्रम्ह परमात्मा घटात प्रगट व्हावा याकरीता रात्रंदिवस आपल्या हृदयात पारब्रम्ह परमात्म्याला भजत आहे.ब्रम्हाचे भजता भजता दिवसांवर दिवस,युगांनयुग व्यतीत होत आहे.परंतु ब्रम्हाला तो साई त्याच्या घटात आधीपासून आहे तरी त्याच्या गतीचा जरा ही प्रकाश होत नाही. ।।१०।।

**सिव शंकर आसा करे ।। भजे न केवळ तोय ।।**
**धिन समरथ सत्त सांईयाँ ।। पार न पावे कोय ।।११।।**

शिव शंकर निकेवळ परमात्मा प्राप्त करण्याची आशा करतो आणि प्राप्त करण्याकरीता रात्रंदिवस खंड न करता निकेवल परमात्म्याला भजतो तरीही त्याचा साईचा पार येत नाही.असा साई समर्थ आहे,त्रिकाळ सत्य आहे,धन्य आहे.शिवशंकर सारखे मोठ मोठे कोणी ही त्याचा पार प्राप्त करु शकत नाही.असा अपार आहे. ।।११।।

**पारबती परले पड़े ।। गिणतन आवे कोय ।।**
**सिव नेहचळ को जुग लूं ।। सरण तुमारी जोय ।।१२।।**

शिव शंकर साईच्या शरणात आल्याने अमर होऊन गेला.निश्चल होऊन गेला.प्रलयात पड्ला नाही आणि पार्वतीने साईचा शरणा स्वीकारला नाही.याकरीता अगणित म्हणजे एक दोन वेळा नाही १०८ वेळा प्रलयात पड्ली. ।१२।।.

**बिशन सरीसा देव सो ।। फिर मोटा अवतार ।।**
**सो सब सेवे ब्रम्ह कूं ।। निरमल तत्त अपार ।।१३।।**

विष्णूसारखे देवता व मोठे मोठे अवतार हे सर्व निर्मल तत्त म्हणजे ज्याचा पार लागत नाही अशा निर्मल ब्रम्हची सेवा करतात. ।।१३।।

**शेंष सिष्ट सिर पर धरी ।। मुख अंतर तुज नाम ।।**
**ता सिर बोझन आवही ।। धिन सब सारण काम ।।१४।।**

शेषनागाने मुखात आणि हृदयात तुझे नाम धारण करुन सृष्टी शिरावर धारण केली.या कारणाने शेषावर सृष्टीचा जराही बोझ येत नाही.असा साई तु सर्वांचे काम सारणारा धन्य आहे. ।।१४।।

**मुख मुख जिभ्या दोय हे ।। होय रहया लव लीन ।।**

**सेस पिछाण्याँ पीव कूं ।। दिल अंतर बिच चीन ।।१५।।**

शेषाला १००० तोंड आहे आणि प्रत्येक तोंडात दोन–दोन जिभा आहेत.अशा २००० जिभांनी शेषनाग रात्रंदिवस तुझे स्मरण करण्यात लवलीन होऊन गेला आहे.याप्रकारे शेषनागाने हृदयात परमात्म्याला ओळखून पारखले आहे. ।।१५।।

**निस दिन रटे नि केवळा ।। केवळ ब्रम्ह बिचार ।।**
**धिन धिन सो सरणा गति ।। पारब्रम्ह पद सार ।।१६।।**


शेषनाग रात्रंदिवस नि केवळ परमात्म्याला रटतो आणि मायेच्या आसऱ्याचा जराही विचार न करता(ठेवता)केवळ ब्रम्हचेच विचार म्हणजे समज ठेवतो.याकारणाने त्याला पन्नास करोड योजन धरतीचा बोज जराही जाणवत नाही.उलट(ओझे)सांभाळण्यात आनंद येतो.याप्रकारे सार असणारे पारब्रम्ह पदाचा शरणा धारण केल्याने असणारे पारब्रम्हच्या पराक्रमाने दु:खाचे सुख बनून जाते.याकरीता सारवाले पारब्रम्ह पदाच्या शरणाची गती धन्य आहे,धन्य आहे. ।।१६।।

**नेहचल निरमल मल नहीं ।। करम न कीट न कोय ।।**
**आद अंत मध अेक हे ।। अधिक न ओछा होय ।।१७।।**

पारब्रम्ह निकेवळ होणकाळ पारब्रम्ह आणि मायेसारखा चलायमान नाही,निश्चल आहे. होणकाळ पारब्रम्हसारखा विकारी वासनांच्या मळाने जराही भरलेला नाही.विकारांनी पूर्ण मुक्त असा मळरहीत निर्मळ आहे.पारब्रम्ह सारपदात कर्मीच्या वासनांचा जराही कीट नाही,असा काळरहीत म्हणजे जुलमांपासुन आणि दु:खापासुन मुक्त आहे.आधी ही तो सर्वां मध्ये एक सारखा होता,मध्ये ही म्हणजे आता ही एक सारखा आहे.आणि अंतमध्ये ही एक सारखा जराही छोटा वा अधिक होत नाही.सदा ही एक सारखा बनलेला असतो.।।१७।।

**धिन तूंहि तुं सांईयाँ ।। धिन तत्त तेरो नाँव ।।**
**तुम बिन सूनो को नही ।। जंगळ रोही गाँव ।।१८।।**

हे साई तु धन्य आहे.काळापासून मुक्त करणारे आहे.पारब्रम्ह तत्त तुझे नाव ही धन्य




आहे.हे साई जंगल,रोही,गाव,शहरात तु नाही म्हणजे तुझ्या शिवाय ती जगात सुनी आहे.अशी कोणती ही जागा ३लोक १४ भवन,३ ब्रम्हचे १३ लोकात नाही.१)जंगल,गाव,शहर खंडीत आहे.अखंडीत नाही.जंगलाचे क्षेत्र,गावाचे क्षेत्र,शहराचे क्षेत्राची मर्यादा आहे.जंगल त्याच्या क्षेत्रानंतर संपून जाते.गाव ही त्याचे क्षेत्र संपल्यानंतर संपून जाते.तसेच शहर ही त्याच्या क्षेत्राच्या पलिकडे राहत नाही.परंतु साई अखंडीत आहे.तो सर्वांमध्ये भरपूर आहे.ओतप्रोत आहे.तो वनात, गावात,शहरात सर्व जागी ओतप्रोत

आहे.२)जंगल संपल्यानंतर पुढचे क्षेत्र जंगल राहत नाही.जंगल स्वभावाने सुने होऊन जाते.परंतु साई जसे जंगलात राहतो तसेच जंगल जेथे नाही तेथे ही तो जसे जंगलात आहे तसाच राहतो.त्याचप्रकारे गाव आणि गावाच्या क्षेत्राच्या पलिकडे सतसाई सारखा राहतो.याप्रकारे तो सर्व जागी ओतप्रोत असतो.त्याच्या शिवाय सुनी जागा एक ही राहत नाही.।।१८।।


**जां देखुं ज्याँ आप हो ।। ऊँच नीच के मांय ।।**
**एसा निपट नजीक हो ।। सब जुग भूला जाय ।।१९।।**

हे साई मी ज्याला बघतो भले ते मायेत उच्चं कर्मी असो किंवा नीचकर्मी त्या सर्वां




मध्ये आपणच आपण आहात इतके जीवाच्याजवळ आधीपासून असुन ही सर्व जगाचे नर–नारी,ज्ञानी,ध्यानी तुला विसरुन गेले आहे आणि विसरत आहेत.आपणच आपण आहात सतशब्द,अखंडीत आणि एक सारखे आहात.याकारणाने तो उचकर्मी आणि निचकर्मी व्यक्ती मध्ये एकसारखा ओतप्रोत भरलेला आहे.।।१९।।

**भरम्यो सब संसार हे ।। चीन सके नहिं कोय ।।**
**तुम अंतर मे रम रहया ।। बाहिर ढूँढे लोय ।।२०।।**





संसाराचे सर्व जीव मन आणि ५ आत्मा या मायेमुळे त्रिगुणी मायेत भ्रमित होऊन गेले आहे.याकरीता हृदयात जवळ असुनही तुला प्राप्त करु शकत नाही.तू इतका आधीपासून हंसाच्या हृदयात रमून राहीला आहे.तरी ही जग मायेत भ्रमित झाल्याने तुला मायेत बाहेर शोधत आहे.तुला ब्रम्हा, विष्णू,महादेव,शक्ती या त्रिगुणी मायेत शोधत आहेत.तुला जप,तप,सत मध्ये शोधत आहे.तुला तिर्थात शोधत आहेत.तुला दगडाच्या मुर्तीत शोधत आहेत.तुला भेरु,भोपा,दुर्गा,सितला सारख्या पापकर्मी देवतांमध्ये शोधत आहे. याप्रकारे सर्व जगातील स्त्री–पुरुष,ज्ञानी,ध्यानी,आधीपासुन तु सोबत असल्यावरही तुला प्राप्त करण्यात भूल(चूक)करीत आहे.अखंडीत सतशब्द आहे म्हणजे सर्वांमध्ये एकसारखा आणि ओतप्रोत आहे म्हणजे ज्याला साई हवा त्याच्यात तो भरपूर आहे. ।।२०।।.

**जगत बिचारी क्या करे ।। तुज गत लखी न जाय ।।**
**बाहिर भीतर केहेत हे ।। एक निरंजण राय ।।२१।।**

जग हे सांगते,ऐकते की हंसाच्या घटात आणि घटाच्या बाहेर एकमात्र निरंजन राय ओत प्रोत विना खंडीत भरलेला आहे.तरी ही तुझी गती जगाच्या लखण्यात येत नाही.

या करीता जग बिचारे तुला प्राप्त करण्यासाठी बाहेर शोधण्याशिवाय काय करु शकते?।।२१।।

**जळ थळ मांहि आप हो ।। साखी भूत समान ।।**
**जुं रिव जळ प्रकाश हे ।। सब घट मे हर जान ।।२२।।**




जसे प्रकाशित सुरज(सुर्य)पाण्याने भरलेल्या कुंभात, नदीत किंवा सागरात जगात कोठे ही बघितले तरी तो त्या पाण्यात सारखाच दिसतो.कोणत्याही प्रकारे कमी जास्त दिसत नाही. याप्रकारे साई पाण्यात,स्थुलमध्ये व प्रत्येक घटात एक सारखा ओतप्रोत रमून राहीला आहे.म्हणजेच साँई प्रत्येक घटात रमून राहिला आहे तो कसा प्रत्येक घटात रमून राहिला आहे.ही पाण्याची सूर्याच्या दाखल्याची समज आणाल तर प्रत्येक स्त्री–पुरुष ज्ञानी,ध्यानींना त्यांच्या घटात ओतप्रोत रमण्याचा भेद समजेल.एकसारखा सत परमात्मा आहे म्हणजे स्वतःच्या हंसात ही सर्वांमध्ये सत परमात्मा जसा विराजमान आहे.तसाच विराजमान आहे. हंसाला त्याला प्राप्त करायचे आहे.हंसामध्ये विराजमान झाल्याने हंसला हंसामध्ये बघायला हवे. हंसापासून त्याला बघायची सुरुवात करायला हवी.हंसातून बघाल तर तो प्रगट होईल आणि प्रगट दिसेल हंस सोडून कोठून ही बघाल तर तो प्रगट होणार नाही.यामुळे अन्य वस्तुंमध्ये दिसणार नाही.।।२२।।

**सूनि सेज न साईयाँ ।। तुम बिन सिरझण हार ।।**
**जां देखुं जहां आप हो ।। ज्योऊँ ग्यान बिचार ।।२३।।**

सतज्ञानाने विचार करतो तर हे सिरजनहार जेथे बघतो.तेथे तुम्हीच तुम्ही आहात असे ज्ञानाने दिसते.आपण नाही अशी सुनी जागा कोठे दृष्टिस नाही येत. ।।२३।।

**जड़ चेतन पर मिल परे ।। ग्यान ध्यान गुण नेम ।।**
**तुम काठा किमत सबे ।। प्रीत न प्रसण प्रेम ।।२४।।**

जड ही तुम्हीच दिसतात.चेतन ही तुम्हीच दिसतात.जड आणि चेतनपासून बनलेली वस्तुही तुम्हीच दिसतात.ज्ञानातही आपण,ध्यानातही तुम्हीच,रजो,सतो,तमोगुणातही आपणच नियमात ही तुम्हीच दिसतात.तुम्ही काठा किंमत हिकमती मध्येही तुम्हीच दिसतात.प्रित मध्येही तुम्हीच प्रसन्नतेत ही तुम्हीच तसेच प्रेम ही तुम्हीच दिसतात. सतशब्द अखंडीत आहे.याकरीता तो जडमध्ये ही आहे व चेतन मध्ये ही आहे.जेथे जड नाही आणि चेतन ही नाही तेथे ही आहे.जड या वस्तुला सुक्ष्म दृष्टीने बघाल तर दिसेल की त्याच्यात मूळ तर दिसेल की त्याच्या मूळमध्ये सतशब्द आहे आणि या

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

सतशब्दाच्या आधारानेच ती माया बनली आहे.(असे सर्वांना लगाव आणि स्पष्टीकरण करा.)।।२४।।

**सुध बुध संक्या आप हो ।। जीव सीव करतार ।।**
**नारायण निर्लेप हे ।। सासो सोग बिचार ।।२५।।**

सुध,बुध शंकेत ही तुम्हीच दिसतात.जीवात ही आपण,शिवात ही तुम्ही,करतार मध्ये ही तुम्ही,नारायण निर्लेप मध्ये ही आपण,सासो म्हणजे काळजीत ही आपण दुःखातही तुम्ही,विचारात आपण याप्रकारे सर्वांमध्ये तुम्हीच तुम्हीच दिसतात. ।।२५।।

**जत सत्त सांवल सांईयाँ ।। तुम जाचक जगदीस ।।**
**दाता मान अमान ले ।। तुम ससा तुम बीस ।।२६।।**

जप आणि सत याचे मध्ये ही तुम्हीच समिल आहात.आणि स्वामीजी तुम्हीच याचक (मागणारे) आणि तुम्हीच जगदीश (जगाचे ईश) आहात.आपणच दाता (देणारे) आहात. तुम्हीच मान घेणारे आणि तुम्हीच अपमान घेणारे आहात.तुम्हीच शशी(अमृत)आणि विष आहात. ।।२६।।

**सांई धिन धरणी धरा ।। साहिब साचा स्याम ।।**
**ब्रम्हा बिष्ण उपाविया ।। किशन गोप का राम ।।२७।।**

स्वामीजी तुम्ही धन्य आहात.धरणी(पृथ्वी)धारण करणारे तुम्ही धन्य आहात.तुम्ही खरे साहेब शाम(स्वामी)आहात.तुम्हीच ब्रम्हा आणि विष्णू यांना उत्पन्न केले आणि तुम्हीच कृष्ण आणि गवळण तसेच रामचंद्र याला ही तुम्हीच उत्पन्न केले. ।।२७।।

**ओऊँ सोऊँ सब किया ।। सगत उपावण हार ।।**
**धिन तो हि धिन सांईयाँ ।। निरालम्ब निराकार ।।२८।।**

तुम्हीच ओअम आणि सोहम या सर्वांना उत्पन्न केले.शक्तीला उत्पन्न करणारे तुम्हीच आहात.धन्य आपल्या या स्वामीजी,तुम्ही निरलंब आहात(कोणावर ही अवलंबीत नाही राहीले)आणि निराकार(आपला आकार नाही)असे आपण आहात. ।।२८।।

**निरभे नर नारी नहीं ।। अंजण मंजण कोय ।।**
**सब बिणसे सब ऊपजे ।। तुम नेहचळ हरि होय ।।२९।।**

तुम्ही निर्भय आहात.तुम्ही जगाच्या पुरुषांसारखे पुरुष ही नाही आणि जगातील स्त्रींया सारखे स्त्री ही नाही.आपल्याला स्त्री-पुरुषांसारखे अंजन(इंद्रिय)ही नाही आणि मंजन वगैरे काही ही नाही.तसेच दुसरे सर्व उत्पन्न होतात आणि सर्व नाश ही होतात आणि आपण हरी मायेच्या पलिकडे असल्याकारणाने निश्चल आहात(चालत नाही)पुरुष,स्त्री, अंजन मंजन माया आहे.मरणारी खंडीत आहे.सतशब्द मायेच्या पलिकडे आहे आणि न मरणारा आहे. ।।२९।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

जुग सारो सब जायगो ।। धर ब्रहमंड आकास ।।
सत्त समरथ अेको धणी ।। जांहाँ जुग जीवा आस ।।३०।।

हा सारा संसार जाईल आणि धरणी,ब्रम्हांड तसेच आकाश ही जाईल आणि आपण सत्त(सदा राहणारे)समर्थ एकच मालक आहात.जेथे संसाराच्या जीवांची आशा आहे तेथे आपणच आहात .।।३०।।

नेहचळ निरभे रामजी ।। सब देवन का देव ।।
दूजा सब उपजे खपे ।। अढळ तुमारी सेव ।।३१।।

आपण रामजी निश्चल आणि निर्भय असे रामजी आहात.तसेच आपण सर्व देवतांचे ही (ब्रम्हा,विष्णू,महादेव यांचे ही)देव आहात,दुसरे सर्व देवता उत्पन्न होतात आणि नाश होतात,परंतु आपण अटल आहात.आपली सेवा ही अटल आहे.(आपली सेवा करणारे ही अटल होऊन जातात).।।३१।।

तुम तारण हरि जोग हो ।। तिण सिर अवर न कोय ।।
काळ कर्म दाणो सही ।। सब अनघड़ बस होय ।।३२।।

जीवाला तारण्या योग्य आपणच आहात.आपल्या पेक्षा पराक्रमी कोणी नाही.हे काळ, कर्म आणि दानव(राक्षस)सर्व आपल्या अनघड्या वश आहेत. ।।३२।।

घड़िया घाट अघाट ने ।। नाना बिध का रूप ।।
बलिंहारी उण देव की ।। कीया सबे सरूप ।।३३।।

हे सर्व घाट अघाटने(ज्याचा घाट नाही असा अघाटाने)घड्वून नाना प्रकारचे पैदा केले. त्या अघाट देवाची बलिहारी आहे.त्याने सर्व प्रकारचे स्वरुप उत्पन्न केले आहेत. ।।३३।।

अण घड़ आद अमुरती ।। मूरत घड़ी अनेक ।।
धिन बाबा करतार तूं ।। कुदरत को गत देख ।।३४।।

आपण स्वत: अनघड आहात आणि सर्वात प्रथमचे आहात.आपण अमुरत असून आपण अनेक प्रकारच्या मूर्त्या घड्वून पैदा केल्यात.सर्वांना बनविणारे आपण बाबा कर्तार धन्य आहात.आपल्या कुद्रतची गती कोण समजू शकतो. ।।३४।।

क्या जाणुं केसे कहुँ ।। वार पार नहिं कोय ।।
आप अमुरत बण रहया ।। रंग न रूप न होय ।।३५।।

आपण तर अमूर्ती होऊन राहिले आहात.आपला तर रंग आणि रुप काही ही नाही तर मी आपल्याला कसे जाणु?आपण कसे आहात?हे कसे सांगु?आपला वारपार काहीच नाही. ।।३५।।

करे करावे कर दिया ।। दीवी कळा बणाय ।।
धिन तूहिं धिन साईयाँ ।। सुख दु:ख गहया न जाय ।।३६।।

आपणच करतात आणि आपणच करवितात आणि आपणच करुन देतात.आपण सर्व कला बनवून दिल्या.धन्य आपण,धन्य साई(स्वामी)सुखाने ही आपल्याला पकडता येत नाही.तर दु:खाने ही आपल्याला पकडता येत नाही.असे आपण सुख दु:ख दोन्ही विधीने पकडमध्ये येण्याच्या पलीकडे आहात. ।।३६।।

**आतम मे प्रमात्मा ।। रमता हे मुझ बीच ।।**
**सुख दु:ख दोनु पर हऱ्या ।। कोरा फरक न कीच ।।३७।।**

आपण माझ्या आत्म्यात आधीपासून राहिले आहात.म्हणजे माझ्या आत्म्यास आधी पासूनच रमून आहात.तरी ही मी जसे मायेचे सुख आणि काळाच्या दु:खात पडून दु:ख भोगत आहे तसेच आपण माझ्या आत्म्यास आधीपासून रमत असूनही या सुख-दु:खा मध्ये जराही अटकले नाही म्हणजे आपण मायेच्या सुख दु:खाला त्यागून स्वत:ला वेगळे ठेवले आहे. ।।३७।।

**किमत सब करतार की ।। केशो करण किल्याण ।।**
**बाणी सुण हेत सेज सो ।। घट घट न्यारी जाण ।।३८।।**

वाणी ऐकणे,प्रिती करणे हे प्रत्येक घटात सहज बनते.आणि प्रत्येक घटा घटाची प्रिती ही वेग-वेगळी असते.प्रत्येक घटात अशी सर्व भारी हिकमत करतारने बनविले आहे. असा तो केशव प्रत्येक आत्म्याचे कल्याण करणारा आहे.म्हणजे सुख देणारा आहे. ।।३८।।

**तुम बिन असी कुण करे ।। अणघड देवा राम ।।**
**लख चोरांसी जीव सो ।। धरिया ठामो ठाम ।।३९।।**

आपण ८४लाख प्रकारचे जीव जागच्या जागी उत्पन्न करुन ठेवून दिले.हे अनघड देव,हे अनघड राम असे कोणाला ही न करता येणारे काम आपल्या शिवाय कोण करु शकतो? ।।३९।।

**नासत् आ सत सब करी ।। करणी किरपण सूर ।।**
**के दाता के मंगता ।। सब में सब सूं दूर ।।४०।।**

नाश होणारा आणि नाश न होणारा हे सर्व आपणच बनविले सर्व करण्या आपणच बनविल्यात.कंजुश,शुरवीर आपणच बनविलेत.काही दाता बनविले काही मागणारे बनविले आणि सर्वांच्या आत्म्यात ओतप्रोत रमून ही या सर्व मायावी प्रकृती पासून दूर राहीले. ।।४०।।

**हाजर सुं हाजर खड़ा ।। जब देखे तब त्यार ।।**
**गाफल गेला ग्यान बिन ।। कूटि जे संसार ।।४१।।**

आपल्या सन्मुख जो हाजर आहे.त्यांच्याशी आपण ही हाजर आहात.ते आपल्याला जेथे

बघतात तेव्हा तेथे आपण तयार असतात.परंतु जो गाफिल ज्ञाना शिवाय मुर्ख आहे ते जीव संसारात पिटले जातात. ।।४१।

सिष वायक ।।

**ऐसा इचरज अर्थ सो ।। बूजत सूँ गुरूदेव ।।**
**जीव सिव ऐको कहया ।। को पूजे को सेव ।।४२।।**

शिष्य बोलला अशा आश्चर्याच्या गोष्टीचा अर्थ गुरुदेवजी आपणास मी विचारतो की, जीव आणि शिव कोणी केले आणि कोण कोणाला पुजतो आहे आणि कोणाची सेवा करीत आहे? ।।४२।।

**कुण दाणो कुण जम हे ।। कुण दाता को सूर ।।**
**को मेला को निर्मला ।। क्या नेड़ा क्या दूर ।।४३।।**

राक्षस कोण आहे आणि यम कोण आहे व दाता देणार कोण आहे तसेच शूर म्हणजे रणवीर कोण आहे?मैला कोण आहे आणि निर्मळ कोण आहे?जवळ काय आहे आणि दूर काय आहे ?।।४३।

**लख चोरासी जीव सो ।। सोऊँ आतम राम ।।**
**इण बिण दूजा को नही ।। तीन लोक बिसराम ।।४४।।**

शिष्य गुरु महाराजांना आपली समज सांगतात कि सर्व ८४ लक्ष योनीतील जीव हे आत्मा राम आहे.३ लोक १४ भवनात आत्मारामा शिवाय दुसरा कोणी नाही हा आत्मा रामच ३ लोक १४ भवनात सर्व जागी विश्राम करतो. ।।४४।।

**जम दाणुं क्या देवतां ।। ब्रम्हा बिष्ण महेस ।।**
**ओऊँ की उतपत सबे ।। स्वर्ग रसातळ सेस ।।४५।।**

यम,दानव(राक्षस)काय आणि देव ब्रम्हा,विष्णू,महादेव हे सर्व ओअम पासून उत्पन्न झाले आहेत.स्वर्ग काय आणि रसातळ(सात पाताळ)आणि शेष हे सर्व ओअम पासून उत्पन्न झाले आहे. ।।४५।।

**आवत जावत राम हो ।। दया करे अनेक ।।**
**जड़ चेतन ग्यानी गुणी ।। सब मध ओऊँ पेख ।।४६।।**

येणारे आणि जाणारे रामच आहे आणि तो अनेक तऱ्हेने दया करतो.जड तसेच चैतन्य आणि ज्ञानी आणि गुणी या सर्वांमध्ये ओअम दिसतो. ।।४६।।

**क्या पूजुं किस कूं तजुं ।। ज्याँ त्याँ में ई होय ।।**
**करमा करके भरमना ।। तांसु दिसे दोय ।।४७।।**

जीव व शिव म्हणजे आत्माराम व ओअम एक आहे तर आता मी कोणाला पुजु आणि कोणाला सोडू?जेथे तेथे मीच मी आहे.(जेथे तेथे मीच मी असल्याने कोणाला पुजू

आणि कोणाला सोडू सर्वांमध्ये ओअम आहे आणि सर्व ओअमपासून उत्पन्न झाले आहे)कर्मांमुळे भ्रम उत्पन्न होऊन गेला.त्या भ्रमाने दोन दिसू लागतात.(भ्रम दूर होऊन गेल्यावर सर्व एकच एक आहे दूसरा कोणी नाही.)।।४७।।

**कर्म भर्म अे किण किया ।। कोण उपावण हार ।।**
**तुम ओऊँ सत्त था पियो ।। ओ मुझ देवो बिचार ।।४८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी शिष्याला प्रश्न केला की कर्म आणि भ्रम हे कोणी बनवले.या कर्म आणि भ्रमाला उत्पन्न करणारा कोण आहे?आपण ओअमची सत्त म्हणून स्थापना केली तर याचा मला विचार सांगा की ओअमची सत्त आहे का?।।४८।।

**सुख दुःख सुं न्यारा रहे ।। पाप पुन्य तज बाद ।।**
**ओऊं सो सब लेत हे ।। परमळ वास सुवास ।।४९।।**

शिष्य उत्तर देतो की,सुख आणि दुःखापासून वेगळा राहतो आणि पाप तसेच पुण्याचा विवाद सोडून देतो आणि ओअमपासून सर्व सुगंध सुवास घेतो. ।।४९।।

**सुख दुख सामल राम हो ।। पाप पुन्य के मांय ।।**
**ओऊँ की उतपत सबे ।। न्यारा शब्द बताय ।।५०।।**

सुख आणि दुःखात रामजी सामिल आहे.(सुख आणि दुःखात रामजी वेगळा नाही)पाप आणि पुण्य करण्यात ही रामजी सामिल आहेच आणि ही सर्व ओअमची उत्पत्ती आहे.(ओअम पेक्षा कोणता दूसरा शब्द वेगळा असेल तर तो मला सांगा?।।५०।।

गुरू वायक ।।

**ता संग सुख दुख अेक नही ।। मन पवना नहिं लार ।।**
**सुरत निरत पूंचे नहिं ।। सो सत्त शब्द बिचार ।।५१।।**

ज्याच्या सोबत मायावी सुख आणि दुःख एक ही नाही मन आणि श्वास नाही तसेच तेथे सुरत आणि निरत हे ही पोहचत नाही.असा जो सतशब्द आहे त्याचा विचार करा. ।।५१।।

**ओऊँ के आगे खड़ो ।। अेक निरंजण राय ।।**
**धिन सत साहिब साईयाँ ।। वाँ लग काळ ना जाय ।।५२।।**

ओअम या मायेच्या वर एक निरंजनराय हा काळाच्या रुपात नेहमी उभा आहे.त्या निरंजनराय काळाच्या वर सतसाहेब आहे.तो सतसाहेब धन्य आहे.हा काळ ओअम या मायेपेक्षा बलवान असल्याने हा ओअम या मायेमध्ये रचमचून घुसलेला असतो आणि दुःख देतो.परंतु सतशब्द या साहेबाच्या जवळ ही पोहचत नाही.या कारणाने ओअमच्या शरणात राहणाऱ्या हंसाला काळ नेहमी दुःख देत असतो आणि सतशब्दाच्या शरणात

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

राहणाऱ्या हंसाला दु:ख देण्याकरीता जराही जवळ जाऊ शकत नाही असा सतसाई हंसांना काळाच्या दु:खातून सोडविण्याकरीता धन्य आहे. ।।५२।।.

**ओऊँ अंछया आतमा ।। परमातम रंरकार ।।**
**तांहि सुं निरलेप हे ।। अंछया आद बिचार ।।५३।।**

ओअम,त्रिगुणीमाया,आकाश,वायु,अग्नी,जल,पृथ्वी अशा पाची आत्मा,मन होणकाळ ईश्वर(परमात्मा)ररंकार म्हणजे सर्व ब्रम्ह हंस या सर्वांपेक्षा सतसाई वेगळा आहे.या करीता तुमची इच्छा म्हणजे चाहणा हीच सर्वांवर आणि श्रेष्ठ आहे. ।।५३।।

**तासुं समंदर पातियो ।। तिरिया गिर वर पहाड़ ।।**
**सो सतस्वरूपी शब्द हे ।। रिष जन ताके बाड ।।५४।।**

ज्याच्या योगाने रामचंद्राने समुद्रावर पुल बांधला आणि ज्याच्या योगाने समुद्रावर पहाड तरले(तरंगु लागले)त्या शब्दाच्या चारी बाजूंनी ऋषी आणि त्रिगुणी मायावी संत हे कुंपण आहे.हे काटेरी म्हणजे धारदार खिळ्यासारख्या वस्तुंपासून बनलेले जसे हिंदुस्तान–पाकिस्तान हद्दीच्या तारेचे कुंपण लागले आहे तसे. ।।५४।।

**धिन धिन शब्द स्वरूप धिन ।। दिष्ट मुष्ट नहि माय ।।**
**अधिक न ऊंडा उतावळा ।। आव न बैठ न जाय ।।५५।।**

धन्य–धन्य तो शब्द आणि ते सतस्वरुप धन्य आहे.तो सतशब्द आणि सतस्वरुप डोळ्याने दिसत नाही आणि मुठ्ठीमध्ये पकडले जात नाही.तो माये सारखा अधिक ही (जास्त ही)नाही.खोल ही नाही आणि उतावळा ही नाही आणि तो माये सारखा येत ही नाही,बसत ही नाही आणि जात ही नाही. ।।५५।।

**हळका ना भारी घणा ।। चवड़ा चित्त न ओख ।।**
**बूढा नहि बाळक काहा ।। सरग नरक नहि मोख ।।५६।।**

तो हलका ही नाही,भारी ही नाही आणि खुप ही नाही.चौडा ही नाही चित ही नाही आणि तो त्रिगुणी मायेसारखा बिकट ही नाही.तो जगातील लोकांसारखा म्हातारा ही नाही आणि बालक ही नाही.तो स्वर्ग ही नाही आणि नर्क ही नाही. ।।५६।।

**परण्या पात्यां वह नही ।। ब्यावन चावन नार ।।**
**जोगन भोगन भर्मना ।। तारण ना तिरण न मार ।।५७।।**

तो अष्टांग योगासारखा मायावी योग आहे.तसा योग ही नाही.तो होणकाळ पारब्रम्ह सारखा भोगी ही नाही.तो त्रिगुणी मायेच्या असत्य सुख सत्य वाटणाऱ्या समान भ्रम ही नाही.तो महाप्रलय पर्यंत विष्णूसारखा तारणारा ही नाही.आणि महाप्रयलापर्यंत तरणाऱ्या जीवांसारखा तरणांरा जीव ही नाही आणि आकाश,वायु,अग्नी,जल,पृथ्वीसारखा मरणाऱ्या पंचतत्वासारखा लग्न झालेला ही नाही.त्याला विवाह करण्याची चाहणा ही नाही तसेच

जगाच्या लोकांसारखे स्त्री पुरुष हे काही ही नाही. ।।५७।।

ऊँचा नहिं अस्मान में ।। नीचा जमी न होय ।।
गुप्ता नहिं प्रगट परे ।। साच न झूट न कोय ।।५८।।

तो उंचावर आकाशात अनड पक्षीसारखा ही नाही आणि खाली जमीनीच्या देहा सारखा जमीनीवरही नाही आणि तो हंसाला समजणार नाही असा गुप्त ही नाही आणि हंसांना समजेल असा देहरुपाने प्रगट ही नाही.तो या गुप्त व प्रगटच्या पुढे होणकाळ ब्रम्हसारखा सत्य आणि त्रिगुणी मायेसारखा खोटा ही नाही. ।।५८।।

पतला जाड़ा ना बण्या ।। झीणो सार न तार ।।
अंमर में परले पड़े ।। आगे मध न लार ।।५९।।

तो ओअम,सोहम शब्दासारखा झीना म्हणजे एकदम बारीक ही नाही.तो होणकाळ पारब्रम्ह सारखा जीवाला महाप्रलयात काळाच्या मुखात न पडू देणारा सार ही नाही. तसेच त्रिगुणी मायेसारखा महाप्रलयात मिटणारा असार ही नाही.तो महाप्रयलापर्यंत तारणाऱ्या विष्णू,शक्ती सारखी माया ही नाही.तो होणकाळ पारब्रम्ह समान अमरही नाही आणि महाप्रलयात प्रलयात जाणारी त्रिगुणी माया ही नाही.ती आज नाही आणि पुढे राहील किंवा ती मागे ही नव्हती आणि पुढे ही राहणार नाही.परंतु आज आहे किंवा मागे ही होती.परंतु आज नाही पुढे ही नाही राहणार अशी त्रिगुणी माया ही नाही. ।।५९।।

जो चितवे तेसा बण्या ।। एेसा इचरज खेल ।।
देवे लेवे कुछ नहीं ।। हेत न बेर न पेल ।।६०।।

त्याला जो कोणी ज्या रुपाने चितवण करतो तो तसाच बनून जातो.असा आश्चर्य-जनक खेळ आहे.तो जगातील लोकांसारखा देणे किंवा घेणे काहीही करीत नाही.तो जगातील स्त्री-पुरुषांसारखे कोणत्या जीवाशी दोस्ती ही करीत नाही किंवा दुश्मनी ही करीत नाही. ।।६०।।

परसण नहिं परलोक हे ।। रेत न राव न रंक ।।
आप अमूरत साईयाँ ।। ब्रोधन बादन संक ।।६१।।

तो प्रसन्न ही होत नाही.तो परलोक ही नाही आणि रयत म्हणजे प्रजा ही नाही आणि राजाही नाही आणि रंक ही नाही.तो स्वत: अमूर्ती(निराकार)साई म्हणजे स्वामी आहे. तो जगातील स्त्री-पुरुषां सारखा कोणाचा विरोध ही करीत नाही आणि वाद ही करीत नाही आणि कोणाची शंका,संकोच करीत नाही व भय ही मानत नाही. ।।६१।।

सब में सामल साथ हो ।। सब सूं न्यारा राम ।।
जेसी जीव की भावना ।। तैसा सारो काम ।।६२।।

तो सर्वांमध्ये सामिल आहे म्हणजे सोबत आहे आणि सर्वांच्या आत राहून सर्वांपेक्षा वेगळा राम आहे.जशी जीवाची भावना राहीली तसेच तो साई त्या जीवाचे कार्य पूर्ण करतो.(जसे प्रल्हादाचे नरसिंह रुपात) ।।६२।।

**जोगी जंगम सेवड़ा ।। षट दर्शण सब लोय ।।**
**आसा जहाँ बासा करो ।। आप निराला होय ।।६३।।**

योगी(कनफटे),जंगम(गळ्यात लिंग बांधणारे),सेवडा(केस उपटणारे,तोंडावर पंट्टी बांधणारे)हे सहा दर्शनी आणि सर्व लोक,ज्याची जेथे आशा असते तेथे आपण जाऊन प्रगट होतात आणि सर्वापेक्षा वेगळे राहतात. ।।६३।।

**गुण किमत थाहा पार नी ।। लागे अर्थ अनेक ।।**
**सुर नर मुनि पच रहया ।। कुदरत तुज नहिं पेक ।।६४।।**

तुमच्या कला आणि गुणांचा थाट किंवा पार येत नाही.आणि लोक अनेक तऱ्हेचे तर्क लावतात.(परंतु तुमचा थाट किंवा पार कोणाला ही मिळाला नाही.आपल्या आपल्या बुध्दीच्या प्रमाणाने सर्व तर्क करतात.सर्व सुर म्हणजे देव,नर म्हणजे मनुष्य आणि मुनी म्हणजे नारद,वशिष्ठ इत्यादी सर्व पचून राहीले.परंतु आपली कुद्रत कोणाच्या समज मध्ये आली नाही. ।।६४।।

**खण्ड जहाँ तुं थळ करे ।। भरिया जहाँ सुष जाय ।।**
**मुवां कूं जिवाड़ ले ।। अमर जंवरो खाय ।।६५।।**

जेथे खंड पडलेला आहे त्या खंडाच्या जागी तुम्ही स्थळ(जागा)करतात आणि जो भरलेला आहे त्याला सुखवून देतात आणि मेलेल्याला जिवंत करुन देतात आणि जो अमर म्हणजे जिवंत आहे त्याला यमाच्या द्वारे मारुन टाकतात.(आपल्याला वाटेल ते करु शकतात)।।६५।।

**ऐसी कुदरत सांईयाँ ।। ओथ पोथ जगदीस ।।**
**राजा कूं सो रंक करे ।। भिक्षक बण्या बोहो ईस ।।६६।।**

स्वामी,तुमची कुद्रत अशी आहे की,तुम्ही स्वतःला पूर्ण जगात ओतप्रोत समावून ठेवतात. आणि जगाला सुख पोहचविण्याकरीता आणि काळाच्या दुःखातून काढण्या–करीता ईश्वर बनून राहतात.आपण अतृप्त राहील्याने राजाला रंक करुन देतात आणि तृप्त झाल्यावर भिक्षुक म्हणजे रंकाला राजा म्हणजे ऐश्वर्यवान करुन देतात. ।।६६।।

**तम तुठां सब होत हे ।। मोख मुगत गत पार ।।**
**ज्युँ चोपड का खेल में ।। पासो जीतण सार ।।६७।।**

तुम्हीच प्रसन्न झाल्यावर सर्व काही होवू शकते.मोक्ष,मुक्ती,गती पण आपण तृप्त म्हणजे प्रसन्न झाल्यावर होऊ शकते.जसे चौसरीच्या खेळात डाव जिंकणारा असतो.त्याप्रकारे

आपण प्रसन्न झाल्यावर जीवांना परमपद मोक्ष मिळून जातो. ।।६७।।

**जीवा के बस कुछ नहीं ।। करो करावो आप ।।**
**कर्म धर्म कळ आप ।। बस छेड़ो पुन न पाप ।।६८।।**

या जीवाच्या वश काहीही नाही.करणारे आणि करवणारे तुम्हीच आहात.कर्म आणि धर्म यांच्या सर्व कला आपल्याच वश आहेत. ।।६८।।

**जीवा कूं प्रदोष दो ।। आप निराळा होय ।।**
**तम पर बारी किण किया ।। धर्म कर्म मिल दोय ।।६९।।**

जीवाच्यावर दोष देतात(कर्म करवणारे आपण आहात.जीवांकडून कर्म तुम्हीच करविता आणि त्या कर्माचा दोष जीवाच्या वर देऊन)तुम्ही वेगळे होऊन जातात.तुमच्या शिवाय दुसरा हा धर्म व कर्म कोणी केला?धर्म व कर्म हे दोन्ही बनविणारे आणखी ही कोणी दुसरा होता का?।।६९।।

**आद उपाया आपने ।। सांसो सोग बिचार ।।**
**तां पीछे जुग जीव सो ।। भुगते बारं बार ।।७०।।**

सर्व प्रथम तर तुम्हीच सांसा म्हणजे काळजी,सोंग दुःख याचे विचार जगात उत्पन्न केले. हे आपण प्रथम उत्पन्न केल्यानेच नंतर संसाराचे जीव वारंवार भोगत आहे.।।७०।।

**गेला अलख बणाविया ।। गिणत न आवे कोय ।।**
**तुम घालो जिण गेल कुं ।। बूई जावे लोय ।।७१।।**

तुम्हीच रस्ते(धर्म पंथ आणि मत–मतांतर)इतके बनवून दिले की,ते समजण्यात ही येत नाही.इतके रस्ते(धर्म पंथ आणि मत मतांतर)बनवून दिले.ते मोजता येत नाही.आपण लोकांना ज्या रस्त्यात टाकतात त्या रस्त्याने सर्व जीव चालत जातात.।।७१।।

**के डूबण की गेल हे ।। तिरणे की करतार ।।**
**धिन धिन हो धरणी धरा ।। सब जुग कियो बिचार ।।७२।।**

किती तरी बुडण्याचे रस्ते आहेत.तर कर्तार हे सर्व रस्ते आपणच बनविलेले आहेत (आणि आपण जीवाला ज्या रस्त्यात टाकतात त्या रस्त्याने जीव चालतो तर यात जीवाचा काय दोष ?तर आपण धरणी धरा(सृष्टीला धारण करणारे)धन्य आहे,धन्य आहे.साऱ्या जगात विचार केला तर आपणच धन्य आहात. ।।७२।।

**देवत दाणु सब किया ।। धर बहमंड आकास ।।**
**एक शब्द सु रच दिया ।। तीन लोक सब बास ।।७३।।**

तुम्ही सर्व दैवत केले आणि सर्व दानव म्हणजे राक्षस बनविले.तुम्ही धरती,ब्रम्हांड आणि आकाश हे सर्व बनविले.तुम्ही एका शब्दाने सर्व तीन लोकांची रचना करुन सर्व पुऱ्या रचून दिल्या.।।७३।।

कांहाँ लग करूं बखाण मै ।। वार न पार न छेह ।।
मात न बाप न तात बिन ।। काया काम न देह ।।७४।।

तुमचे मी कोठपर्यंत वर्णन करु.तुमचा वार–पार अंत काही मिळत नाही.आपण आई–वड्लिांशिवाय आणि आजोबा(तात)शिवाय आहेत आणि आपल्याला काया आणि काम ही नाही.आपण देहा शिवाय विना देहाचे आहात. ।।७४।।

ओपत नेपत बीज बिन ।। जाया जनम न कोय ।।
आपो आप अमुर्ति ।। अवर न दूजो होय ।।७५।।

तुमची उत्पत्ती ही नाही आणि उत्पन्न ही नाही झाले आणि तुम्ही बिजाशिवाय आहात. आपण जन्मले ही नाही आणि उत्पन्न ही नाही झाले.तुम्ही स्वयंम,स्वतःचे रचनाच अमूर्ती आहे.परक्या आसरेने बनलेले दुसरे कोणी ही नाही. ।।७५।।

तम सुं सब ही नीसरे ।। पाछा फेर समाय ।।
तम नेहचल निर्भे सदा ।। आवन इसकन जाय ।।७६।।

तुमच्या पासूनच सर्व निघाले आहेत आणि हे सर्व परत तुमच्यातच समावून जातील आणि आपण निश्चल आहात.निर्भय म्हणजे भयरहीत आणि सदा म्हणजे नेहमी राहणारे, येणारे–जाणारे नसून येऊन कोणाचे प्रेम ही करीत नाही. ।।७६।।

हाल न चाल न डोल हे ।। इत उत दिस न कोय ।।
बायर भीतर सुनं हे ।। इत उत साहेब होय ।।७७।।

आपण हालत नाही,चालत नाही आणि झ्रामगत ही नाही.येथे व तेथे कोठेही दिसत ही नाही.बाहेर,आत व सुन्या जागी अशा सर्व जागी आपण साहेबच आहेतच आहेत.।।७७।।

साचा समरथ सांईयाँ ।। ने चल चले न खीण ।।
तुम डाढी सत्त गाय बी ।। मै ताराँ जुग बीण ।।७८।।

खरे समर्थ स्वामी निश्चल आहात आणि आपण क्षीणही होत नाही.आपण गायन करणारे, खरे गाणारे आहात आणि मी आपल्या वीणेचा तार आहे. ।।७८।।

जैसे आप बजाव हो ।। तैसे बाजण हार ।।
दोस न दीजो साईयाँ ।। निरधारा आधार ।।७९।।

जसे आपण(गाणारे)वीणेला वाजवाल तशी ती वाजेल(वीण वाजविणाऱ्याच्या आधीन आहे वीणा आपल्या मनाने काही वाजत नाही.आपण वीणेला जसे वाजवाल तेव्हा तशीच वाजेल)तर वीणेला दोष देऊ नका वीणा निराधार आहे. ।।७९।।

बलि जाऊँ सत शब्द की ।। वार फेर दुँ प्राण ।।
जिण मोकूं पेदा कियो ।। तन मन दीयो आण ।।८०।।

मी तुमच्या सतशब्दावर आत्मार्पण आहे.ज्याने मला पैदा केले आणि मला हे शरीर देऊन

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

मन आणून दिले अशा सतशब्दावर आपले प्राण समर्पित करुन देतो. ।।८०।।

**नख चख सरब बणाविया ।। खंड ब्रहमंड पिंड मांय ।।**
**धिन समरथ अेको धणी ।। तो गत लखी न जाय ।।८१।।**

ज्याने माझे नख आणि डोळे सर्व बनवून माझे शरीर बनविले आहे आणि या शरीरात खंड आणि ब्रम्हंडाची रचना बनवून दिली आहे.धन्य हो सामर्थ्य,आपण असे एकच मालक आहात.आपली गती ओळखण्यात येत नाही. ।।८१।।

**कीडि कुंजर आद ले ।। धरी सबे अे नाण ।।**
**पाँचुं इन्द्रि आतमा ।। नव खंड पृथ्वी जाण ।।८२।।**

मुंगी आणि हत्ती यांचे सर्व निशाण म्हणजे चिन्ह वेगवेगळे बनविले(ज्या कारणाने सर्व ओळखले जातात की ही मुंगी आहे आणि हा हत्ती आहे अशा बनविलेल्या निशाणांनी ओळखले जातात)हे पाची इंद्रिय आणि आत्मा व या पृथ्वीचे नऊ खंड हे सर्व निशाण हे ओळखले जातात. ।।८२।।

**तीनु चवदे लोक सो ।। सब धर ओ बेराट ।।**
**बाहिर भीतर सुत ले ।। कीया अेकण घाट ।।८३।।**

तीन लोक चौदा भवन व सर्व धरती आणि हा वैराट बाहेरुन आणि आतून सूतने म्हणजे समजून उमजून एकाच घटात बनवून दिले. ।।८३।।

**अवगत अलख अपार तुं ।। निमो निमो निरलंब ।।**
**तूंहि तुं सत्त साच हे ।। परापरी पर झंब ।।८४।।**

अविगत तुमची गती नाही,अलख(आपण समजण्यात येत नाही)अपार म्हणजे आपला पार ही येत नाही असे आपण आहात.आपल्याला नमस्कार आहे.नमस्कार आहे.तुम्ही कोणावरही अवलंबित नाही असे निरालंब आहात.तुम्ही सत्य आहात,तुम्ही खरे आहात, तुम्ही परापरी पासून आहात. ।।८४।।

**अेसा तत्त बणाविया ।। धरिया या घट मांय ।।**
**गंगा जमना सुरसती ।। चंद सूर बोहो लाय ।।८५।।**

असा तत्त तुम्ही बनऊन या घटात ठेवला आहे.या घटात गंगा,यमुना,सरस्वती(इडा, पिंगळा,सुषमना)चंद्र आणि सूर्य असे खुप आणून या घटात ठेवून दिले. ।।८५।।

**तारा मंडळ देवता ।। धर ब्रहमंड आकास ।।**
**काया में सारा धरत ।। सिमरथ सासो सास ।।८६।।**

तारामंड्ळ,देवता,धरणी,ब्रम्हांड,आकाश या शरीरात सर्व ठेवून दिले आणि या शरीरात श्वासो श्वास ठेवून दिला असे आपण समर्थ आहात. ।।८६।।

**बादल बीजल दामणी ।। इंदर अेसा होय ।।**

घट घट साहेब सब किया ।। बिरला चीने कोय ।।८७।।

ढग,विज,दामिणी म्हणजे विद्युल्लता,इंद्र असे जे आहेत आपण साहेब हे सर्व घटा घटात बनवून दिले असे सामर्थ्यशाली आपल्याला एखादाच ओळखतो. ।।८७।।

ग्यान ध्यान जत जोग ले ।। अमृत मीठी बाण ।।
काया मध सब घर दिया ।। नव तत्त च्यारू खाण ।।८८।।


ज्ञान,ध्यान,जप म्हणजे ब्रम्हचर्य,योगपर्यंत आणि अमृतासारखी गोड बोली हे सर्व या शरीरातच ठेवून दिले.या शरीरात नऊ तत्व आणि चारी खाणी ठेवून दिले. ।।८८।।

पेम नेम प्रतीत सो ।। ब्रेह बात बैराग ।।
सुध बुध सारी अकल ले ।। धरिया जागो जाग ।।८९।।

प्रेम,नियम,प्रतीती म्हणजे विश्वास विरह,गोष्टी,वैराग्य,शुध्दी,बुध्दी सर्व अक्कल हे सर्व घेऊन सर्व जागच्या जागी ठेवून दिले. ।।८९।।

किरचा किरचा बणाय कर ।। जोडया सकल सरीर ।।
तां मध क्या क्या तें किया ।। पेम नेम गुण पीर ।। ९० ।।

या शरीराचे सर्व तुकडे तुकडे करुन जोडून हे शरीर बनविले आणि या शरीरात आपण काय बनविले प्रेम,नियम,गुण असे शरीरात बनविले. ।।९०।।




पाप न पुन न कामना ।। दीया सबे बणाय ।।
तामस तरक न रीस ले ।। भरदी सब घट मांय ।।९१।।

पाप आणि पुण्य व कामना हे सर्व बनवून दिले.क्रोध,तर्क, रीस,रागीटपणा हे सर्व घेऊन सर्व घटात भरुन दिले. ।।९१।।

अवगत आतम आपले ।। पलटया मूल निध्यान ।।
अेके सुबो हो ऊपजी ।। तर वर बीज न पान ।।९२।।

तुम्ही माझी अविगत आत्मा मुळात जशी होती त्या मूळालाच पूर्ण पलटून दिले.जसे एका बीजाने झाड,पत्ते आणि अनेक बीज लागतात आणि ज्या बिजाने झाड,पत्ते (पाने)अनेक बीज लागले ते बीज मूळ बीज अस्तित्व दिसत नाही.ते झाड,पाने या रुपात बनून जाते.याप्रकारे माझ्या अविगत आत्म्याचे मूळ सुक्ष्म रुप पलटून (बदलून) गेले आणि मायेचे स्थुल रुप येऊन गेले.।।९२।।

समरथ तेरी साईयाँ ।। क्या के गाऊँ तोय ।।
मेरे जिभ्या अेक हे ।। तु घण नामी होय ।।९३।।

समर्थवान स्वामी तुमचे मी काय म्हणून,यश कसे वर्णन करु?मला तर एक जीभ आहे आणि आपले खुप नाव असल्याने तुम्ही नामी आहात. ।।९३।।

कैसे सिंवरू साइयाँ ।। सेवा मुझ बताय ।।

तें चाला बोहो चालिया ।। तामे भर्म न काय ।।९४।।

आता मी तुमची कोणत्या तऱ्हेने सेवा करु?तुमची सेवा कशी केली जावी?हे मला सांगा?तुम्ही खुप प्रकारचे चोळे बनवून दिले त्या चोळ्यामध्ये भ्रम टाकून दिले.चाली रिती बनवून दिल्यात. ।।९४।।

पेड न डाळ फळ पात जुं ।। लीला करी अनेक ।।
अंस दाखल सब ठोड हो ।। ने चल कहाँ जन पेख ।।९५।।

तुम्ही एकाच बीजापासून अनेक वृक्षांच्या फांद्या,फळ,पत्ते अनेक प्रकारच्या लीला करुन दिल्या.तुम्ही या प्रकारे सर्व जागी निश्चल आहात.तुम्हास संतांनी कोठे बघावे. ।।९५।।

पान पात फळ डाल कूं ।। असत न किवी जाय ।।
नेहचल निर्भे न रहे ।। ओ सांसो मुज मांय ।।९६।।

पान,ढ्हाळ्या,फळ,फांद्या याला असत्य म्हणजे खोटे म्हणता येत नाही.(त्यांना खोटे तर म्हटले जात नाही)परंतु हे निश्चल रहात नाही.(फांद्या,पान,फळ-फुल यांचा सर्वांचा नाश होतो आणि प्रत्यक्ष ही दिसतो.याकरीता यांना खोटे म्हटले जात नाही. परंतु यांचा नाश होऊन जातो याची मला चिंता आहे.।।९६।।

नाव तुमारा साइयाँ ।। गिणत न आवे कोय ।।
अखर आद सरूप वे ।। सो बगसो सच मोय ।।९७।।

स्वामीजी तुमच्या नावाची गिणती(मोजणी)केल्याने होऊ शकत नाही.परंतु अक्षर(जे क्षर नाही असे ते क्षय न होणारे)आदी स्वरुपी जे आपले नाम आहे ते नाव मला द्या. ।।९७।।

ताते तुम हम को मिलो ।। मै तो में गर काब ।।
सो सिंवरण दीजे सही ।। सुण सत्त मेरो जाब ।।९८।।

ज्या नावाचे स्मरण केल्याने तुम्ही मला मिळाल आणि ज्या नावाचे स्मरण करुन मी आपल्यात मिळून जाईल.असे नाव मला द्या.ही माझी खरी इच्छा ऐका.।।९८।।

आकारी केता मिलो ।। रूम रूम तम होय ।।
पतिव्रता सत्त पीव बिन ।। दूजो कहे न कोय ।।९९।।

आकारी ज्याने आकार धारण केला आहे.असे मला कितीही मिळाले.परंतु तुम्ही माझ्या रोमा रोमात होऊन जा.जसे पतिव्रता स्त्री आपल्या खऱ्या पतीच्या शिवाय दुसऱ्याला पती म्हणत नाही.त्याचप्रकारे माझ्या रोमा रोमात आपणच असायला हवे.।।९९।।

मेरी इंच्छा आप सूं ।। सतसरूपी राम ।।
बीज सरूपी ब्रम्ह हे ।। पात स्वरूपी धाम ।।१००।।

माझी इच्छा तुम्ही रामजी माझ्यात प्रगट व्हावे हीच आहे.माझ्यात ब्रम्ह आणि त्रिगुणी माया दोन्ही ही प्रगट आहे.ब्रम्ह हे बीजा सारखे आहे.त्याच्याने उत्पत्ती आहे.माया ही पानासारखी आहे.म्हणजे मरणारी आहे.उत्पत्ती आणि मरणे याच्या पलिकडे आपण आहात.मला उत्पत्तीमध्ये आणि मरण्यात ठेवू नका.याकरीता तुम्ही माझ्यात प्रगट व्हावे.ज्याने उत्पत्ती आणि मरण माझे मिटून जाईल. ।।१००।।

आवागवण न ऊपजू ।। जीवन खोज मिटाय ।।
ऐसी कर करतार तुं ।। काळ न झाँपे आय ।।१०१।।

मी आवागमनात उत्पन्न व्हायला नको.मायामध्ये जिवंत राहण्याचे चिन्ह मिटवून द्या. तर हे सतस्वरुप कर्ता पुरुष मला असे बनवून द्या की माझ्यावर काळ झडप घालू शकणार नाही. ।।१०१।।

मै सरणा गत साईयाँ ।। अवगत आतम राम ।।
आसा तृष्णा मेट हो ।। परसण कर सब काम ।।१०२।।

स्वामी मी तुमच्या शरणात आहे.तुम्ही अविगत आहात आणि मी आत्म्याचे रामजी तुमच्या शरणात आहे माझी मायेच्या सुखाची आशा आणि तृष्णा मिटवून द्या.।।१०२।।

कृपा कर किरता निधे ।। चरणा राखो मोय
निरमल की ज्यो आतमा ।। सिंवरावो हरि तोय ।।१०३।।

तुम्ही प्रसन्न होऊन होणकाळ कर्तारला न देऊन आपल्याच चरणात मला ठेवा आणि माझी आत्मा निर्मळ करुन आपलेच स्मरण करण्यास मला लावा. ।।१०३।।

ऐसो बल बैराग दे ।। मोह न माया खंड ।।
निरपख कर संसार सुं ।। तुज सेती सब मंड ।।१०४।।

मला असे वैराग्य द्या असे बळ द्या की मला मोह उत्पन्न न व्हावा आणि मायेच्या द्वारे खंड पडायला नको.या संसारापासून मला वेगळे करुन द्या आणि आपल्याशी पूर्ण लगन(लीव)लावून द्या. ।।१०४।।

पाँचु पिसण पछाड़ हो ।। परमेश्वर प्यारा ।।
निश दिन तोहि न बीसरूं ।। कर जन का सारा ।।१०५।।

हे माझे पाची वैरी(काम,क्रोध,लोभ,मोह,मत्सर)यांना पळवून द्या आणि आपण परमेश्वर माझे प्रिय बनून रहा आणि रात्रंदिवस मी आपल्याला विसरणार नाही अशी माझी लीव लावून द्या. ।।१०५।।

काम क्रोध अहंकार कूं ।। पालो परमानंद ।।
साहिब सरणे राख हो ।। जन का काटो फंद ।।१०६।।

या काम,क्रोध,अहंकार यापासून मला वाचवा आणि साहेब मला तुम्ही आपल्या शरणात

ठेवून माझे सर्व फंद कापून द्या.(टाका)।।१०६।।

**मेंतें दुबध्या मेट हो ।। नारायण निरलेप ।।**
**तो सुं कदे न ओचठुं ।। ऐसा चित में चेप ।।१०७।।**

मी आणि तुम्ही अशी दुबध्या मिटवून द्या.हे नारायण निर्लेप,तुमच्या पासून मी कधी ही उबणार नाही असे माझ्या आत माझे चित्त टिकवून द्या. ।।१०७।।

**धेष धाष दूरा करो ।। धरणी धर भरतार ।।**
**ऐसो सत्त पठाव ज्यो ।। जूळुं तुमारी लार ।।१०८।।**

हे सर्व द्वेष,धास दूर करुन सर्व मिटवून द्या.तुम्ही धरणी धरा माझे मालक आहात आणि माझ्या करीता असे सत्त पाठवून द्या की तुमच्या सोबत जळून जाईल.इतके जसे सती स्त्रीमध्ये सत आल्याने ती आपल्या मृत पती सोबत जळून जाते तसेच माझ्यात सत पाठवून द्या की तुमच्या करीता मी माझे प्राण सुध्दा देऊन देईल असे सत्त मला पाठवा. ।।१०८।।

**चाय बिषे रस मेट हा ।। हरजी हरो बिराध ।।**
**आन उपासी दूर कर ।। कीजो अपनो साध ।।१०९।।**

माझ्या मनात जी काही विकारी इच्छा आहे ती मिटवून द्या आणि पाची विषयांचे विषयरस यांची ही चाहणा मिटवून द्या आणि ज्या काही अड्थळा टाकणाऱ्या गोष्टी आहे.त्या सर्वांचे हरण करा.आणि अन्य मायेच्या उपासना(दुसऱ्याची उपासना करणे हे माझ्यापासून दूरा करा आणि दुसऱ्यांची उपासना करणारे ही)माझ्यापासून दूर करुन आपली साधना करणारा भक्त बनवून द्या. ।।१०९।।

**चिंता चित्त बिन आस का ।। मेटो अवगत नाथ ।।**
**कृपा कर केसो धणी ।। राख तुमारे साथ ।।११०।।**

माझ्या मनाची चिंता आणि चितवन तसेच मनाची मायेची आशा हे सर्व मिटवून द्या. आपण अविगत माझे नाथ आहात आणि कृपा करुन मला हे मालक,तुम्ही आपल्या सोबत ठेवा. ।।११०।।

**सिकल बिकल मन मेट हो ।। नेचल कर जगदिस ।।**
**ऐसी दृढता धार दे ।। पूरण बिस्वाबीस ।।१११।।**

हे माझ्या मनाचा संकल्प-विकल्प करणे मिटवून द्या.हे जगदीश म्हणजे जगाचे ईश या माझ्या मनाला निश्चल करुन द्या.माझ्या मनात अशी पूर्ण दृढता धारण करुन द्या की माझे मन आपल्यात वीस वीसवे पक्के करुन द्या. ।।१११।।

**पाप न पुन न दूर कर ।। सोग भिन्न सांसो मेट ।।**
**बीज जलावो आत्मा ।। अवगत सुं कर भेट ।।११२।।**

माझे पाप आणि पुण्य हे पण दूर करुन सोग म्हणजे मरणाऱ्याचे दु:ख होणे आणि भिन्न द्वैतपणा आणि चिंता हे सर्व मिटवून द्या.बीज म्हणजे त्रिगुणी मायेचे सार पाच विकारी सुख भोगण्याची वासना ज्याकारणाने भोग भोगण्याकरीता जन्म घ्यावा लागतो.तशी वासना जाळून टाका आणि या आत्म्याची अविगत राम आपल्याशी भेट करुन द्या. ।।११२।।

**भर्म कर्म भै भांज हो ।। भगवत जनम सुधार ।।**
**तुम हम बीचे हो रहया ।। सो सब जोधा मार ।।११३।।**

माझे भ्रम आणि कर्म व भय हे सर्व तोडून हे भगवंता माझा जन्म सुधरवा.तुमच्यात आणि आमच्यामध्ये तुम्ही आणि आमची भेट होण्यात अडथळा करणारे असे जे योध्दे आहेत.अशा योध्दांना मारुन हटवून द्या. ।।११३।।

**कसर कोर काची सबे ।। भांजो दीन दयाल ।।**
**जन अपणो हरि जान के ।। कृपा करे प्रतिपाल ।।११४।।**

माझ्या आता जी कसर कोर आणि जो काही कच्चापणा असेल तो दिनदयाळ तोडून द्या.हे हरी,तुम्ही मला आपले समजून कृपा करुन माझा प्रतिपाल करा.।।११४।।

**आळस अंग मिटाव ज्यो ।। परमातम परदेव ।।**
**एसा साम नवाज हो ।। करूं अटल सत्त सेव ।।११५।।**

माझा आळशी स्वभाव मिटवू द्या.परमात्मा देव,तुम्ही माझे स्वामी आहात.जनांवर कृपा करणारे आहात.मी तुमची अटल म्हणजे सदा फलित राहणारी अशी संत सेवा करेल.।।११५।।

**निंद्रा नासत झूठ भै ।। जोबन जंवरो मार ।।**
**साहिब ए झूठा घणा ।। सब जुग चाल्यो हार ।।११६।।**

निद्रा ही खोटी आहे.याच्यात काळाचे भय आहे.तसेच जवानी ही यमाची मार आहे. साहेबजी हे सर्व खोटे आहेत यांच्या पुढे सर्व जग हारुन गेले.।।११६।।

**जन पर किरपा कीजिये ।। ए सब राखो दूर ।।**
**आठ पहर अखूट ले ।। राखो स्याम हजूर ।।११७।।**

माझ्यावर कृपा करा आणि हे सर्व माझ्यापासून दूर ठेवा आणि हे मालक,नेहमी अष्टोप्रहर अखुंट(न खुंटता)मला तुमच्या चाकरी मध्ये ठेवा. ।।११७।।

**प्रेम पठावो प्रीत दो ।। प्रगल करो सरीर ।।**
**ब्रह उपावो रामजी ।। ग्यान गळावो तीर ।।११८।।**

तुमच्या करीता प्रेम प्रगटेल असा स्वभाव बनवून द्या.तुमच्याशी प्रिती येईल अशी माझी प्रकृती(स्वभाव)बनवून द्या.तुमच्या करीता माझे शरीर वितळून द्या.माझ्या हंसात

तुमच्या करीता विरह उत्पन्न करुन द्या आणि मी तुमच्या कैवल्य विज्ञान ज्ञानात राहील असे माझ्या हृदयात ज्ञानाचे तीर गाडून द्या. ।।११८।।

**तुम प्रसण प्रचित मिलो ।। अेसी कर सत्त स्याम ।।**
**जन कूं दोष न दीजियो ।। तुम सारो सब काम ।।११९।।**

तुम्ही प्रसन्न होऊन आपला समजून भेटा.हे सतश्याम,तुम्ही मला दोष देऊ नका. तुम्हीच माझे सर्व काम पूर्ण करुन द्या. ।।११९।।

**ओ जुग आतम पूतली ।। तम बाजीगर राम ।।**
**ईचरज खेल पसारियो ।। कळ किमत सब धाम ।।१२०।।**

हा संसार आणि संसारातील सर्व आत्मा कठपुतली सारख्या आहेत आणि आपण रामजी कठपुतलीचा खेळ करणारे बाजीगर आहात.आपणच हा आश्चर्यांचा खेळ फैलवला आहे. सर्व कला,ज्ञान आणि सर्व मायेचा आपणच पसारा केला आहे. ।।१२०।।

**जैसे आप नचाव हो ।। तैसे राचे जीव ।।**
**बाजीगर बस पूतळा ।। मै तुम बस युँ पीव ।।१२१।।**

(जसे बाजीगर कठपुतलीला नाचवतो तशी ती नाचते.)तसेच आपण या जीवाला जसे नाचवता तसेच हा जीव नाचतो.जसे कठपुतली खेळ दाखवणाऱ्याच्या वशमध्ये आहे. तसे मी पण माझे मालक आपल्या वशमध्ये आहे. ।।१२१।।

**ज्युँ गुडिया उड असमान मे ।। पावन के बस होय ।।**
**यूँ कर्मा बस आतमा ।। दुख पावत हे लोय ।।१२२।।**

जसे पतंग आकाशात उडून हवेच्या वश होऊन जाते.याप्रकारे,हा आत्मा कर्माच्या वश होऊन दु:ख भोगतो.(जसे पतंग आकाशात उडून जास्त हवेमुळे चक्कर खाऊन झाडावर किंवा जमीनीवर खाली पडून जाते आणि फाटून जाते आणि पतंगाला योग्य(अनुरुप उचित)हवा राहीली.तर स्थिर राहून वरती उडते.असेच कर्माच्या वश हा आत्मा दु:ख भोगतो असेच कर्माच्या वश सर्व लोक दु:ख भोगतात. ।।१२२।।

**मोह डोरि आतम गुडि ।। पवन कर्म करूंर ।।**
**सब बस हे तुझ साईयाँ ।। ज्युँ डोरी गेह सूर ।।१२३।।**

पतंगाला जशी दोरी लागलेली असते तसे आत्म्याला मोहाची दोरी लागलेली असते. हवेमुळे पतंग जसे आकाशात उडते तसे जीवाचे कठोर कर्म जीवाला संसारात नाचवतात. जसे पतंगाची दोरी पतंग उडविणाऱ्याच्या हातात लागलेली असते तसेच सर्व आत्म्यांची दोरी आपल्याच वश आहे. ।।१२३।।

छंद ।। भुजंगी ।।

**धिनो राम राया ।। बड्डा देव दूजा ।। करे सेव सारा ।। सबी संत पूजा ।।**

सबे सरण आया ।। किया भेद भारी ।। लखे जन पूरा ।।काया सोज सारी ।।१२४।।

तुम्ही रामजी धन्य आहात दूसरे सर्व मोठे मोठे देव आपली सेवा करतात आणि सर्व संत आपली सेवा करतात.सर्व आपल्या शरणात यावे असा आपण खुप भारी भेद केला.आपल्याला जे पूर्ण संत आहेत तसे ओळखतात.ज्या संतांनी आपली सर्व काया शोधली तेच आपल्याला ओळखतात. ।।१२४।।

दाणुं देव देवा ।। करे जुध भारी । तिहुँ लोक धूजे ।। निमो गत थारी ।।१२५।।

राक्षस आणि देव व देवी म्हणजे शक्ती हे सर्व आपसात खुप भारी युध्द करतात. तुमच्याशी तीन्ही लोक व देवी-देवता व राक्षस हे सर्व धुजतात(घाबरतात)तुमची या कोणाला ही न समजण्यात येणाऱ्या गतीला नमस्कार आहे. ।।१२५।।

बडा रिष सारा ।। धरे ध्यान ग्यानी ।। करे संत सेवा ।। बिधो बिध जाणी ।।

छंद ।। मोतीदान ।।

अेको हरि आप अजीत अनाथ ।। किया जुग जीव भरे बोहो बाथ ।।१२६।।

दुसरे मोठ-मोठे सर्व ऋषी आणि सर्व ज्ञानी आपले ध्यान करतात आणि संत ही तुमची विधी-विधीने(कोणी कोणत्या विधीने तर कोणी कोणत्या विधीने)आपल्याला ओळखून आपली सेवा करतात.तुम्ही स्वयं हरी एकच आहात.आपण अजीत म्हणजे कोणाकडून ही जिंकले जात नाही.अनाथ म्हणजे तुमच्यावर कोणी मालक नाही आणि तुम्ही संसारात जीव बनविले.ते सर्व आपसात एक-दूसऱ्याशी खुप तऱ्हेने भांडतात. ।।१२६।।


अडे सब खाण तुमारे काज ।। काहा तुम खेल कियो महाराज ।।१२७।।

सर्व खानी तुमच्या करीता अडतात तर महाराज हा आपण काय खेळ बनविला आहे? ।।१२७।।

करे सो कूण करावे हे काम ।। धरे कुण ध्यान तुमारा हो राम ।।१२८।।

हे काम करते कोण?आणि करवितो कोण?आणि रामजी तुमचे ध्यान कोण धरतो.(करतो)।।१२८।।

तुंहि तुं देव बण्यो तुं दुग ।। तुंहि तुं मास बण्यो तुं जुग ।।१२९।।



तुम्हीच देव आणि तुम्हीच द्रगपाल बनले आहात आणि तुम्हीच तुम्ही महीना बनले आहात तुम्हीच तुम्ही युग झाले. ।।१२९।।

तुहि धर लंब बण्यो आकास ।। तुं हि जल नीर उपावण आस ।।१३१।।

तुम्हीच धरती(जमीन)आणि तुम्हीच आकाश बनले आणि तुम्हीच पाणी आणि तुम्हीच पाण्याची आशा करणारे तुम्हीच. ।।१३१।।

किया थे ठाम अनेकाँ अनंत ।। रहे तुं ठोड लखे को संत ।।१३२।।

आणि तुम्हीच राहण्याचे ठिकाण अनेक अनंत बनविले आणि तुम्ही कोणत्या ठिकाणी राहतात हे कोणी एखादाच संत जाणतो. ।।१३२।।

**बण्यो तुं भाव भलाई राम ।। करी ते देह बणाया दाम ।।१३३।।**

आणि तुम्हीच रामजी भाव बनले आणि तुम्हीच हा देह बनविला आणि देहात तुम्हीच धाम बनविले. ।।१३३।।

**उपाया जीव अनंत अपार ।। दिया सुख दुख जिवा जुग लार ।।१३४।।**

तुम्हीच जीव अनंत अणि अपार बनविले आणि या जीवाला जीवाच्या मागे संसारात सुख आणि दुःख लावून दिले. ।।१३४।।

**किया ते धंध बणाया धाम ।। हुवो तुं जम काहा तुं राम ।।१३५।।**

तुम्ही हे सर्व धंधे बनविले आणि हे सर्व धाम बनविले आणि तुम्हीच यम झाले आणि कोठे ही राम बनले. ।।१३५।।

**किया तें के मइसी बिध सूत ।। जणे किम नार अघाटे हे पूत ।।१३६।।**

तुम्ही कसे कोणत्या तऱ्हेने सूतने(विचार करुन)बनविले की ह्या स्त्रीयाँ प्रसव करतात आणि कसे विकट घाटाने बालकाला जन्म देतात. ।।१३६।।

**नव विध मास रखे ग्रभ बाल ।। किसी बिध राम किवी प्रतिपाल ।।१३७।।**

गर्भात बालकाला नऊ महिने कोणत्या विधीने ठेवतात.गर्भात रामजी आपण कोणत्या विधीने सांभाळ केला. ।।१३७।।

**केहुँ मै तोय केतियेक बार ।। किसी बिध राख्या जीव आहार ।।१३८।।**

तुम्हाला मी किती वेळ सांगू?हा आपण कोणत्या प्रकारे जीवाला गर्भात आहार दिला? ।।१३८।।

**अनो अनपान भखे नर नार ।। किसी बिध नार कियो संभार ।।१३९।।**

अन्न आणि पाणी स्त्री-पुरुष खातात(अन्न आणि पाणी खालेले अन्न आणि पोटातून जे गुदा-घाटाद्वारे बाहेर होऊन जाते.परंतु बालक नाही पडत तर गर्भातील बाळाला न पाडता कसे ठेवले?आणि त्या बाळाला आहार कसा पोहचवला?आणि केलेला आहार पडून गेला.(गर्भ न पडता राहून गेला)तर गर्भाला स्त्रीने कशा प्रकारे सांभाळले?।।१३९।।

**रखे ग्रभ जीव किसी बिध राम । जलो अन अहार भखे उण धाम ।।१४०।।**

गर्भाच्या जीवाला रामाने कोणत्या प्रकारे ठेवले?ज्या जागेवर पाणी आणि अन्न भक्षण करतो आहे. ।।१४०।।

**बहे जल घाट झरे मल सोय ।। किसी बिध जीव रहे नित्त जोय ।।१४१।।**

आणि तेथून(ज्या जागी गर्भ राहतो तेथून)पाणी मुत्र वाहत असते आणि तेथून मळ झिरत असतो त्या जागेवर हा जीव नेहमी कोणत्या तऱ्हेने राहतो. ।।१४१।।

**किया तें केम किसी बिध राम ।। जळो रज बूंद धरी मेह ठाम ।।१४२।।**

तुम्ही रामजी कोणत्या प्रकारे या जीवाला बनविले?जळ रज आणि बिंदू त्याच्या आत त्या जागी कसे रोखून ठेवले. ।।१४२।।

**घड़या तें केम किसी बिध जीव ।। कहुँ मै तोय बतावो पीव ।।१४३।।**

त्या जागी रज आणि बिंदूने या जीवाला कशा तऱ्हेने घड्वून बनविले.मी आपल्याला सांगतो,हे माझे मालक मला सांगा. ।।१४३।।

**नहि घण राछ संडासी नॉय ।। किसी बिध जीव घडया हर माय ।।१४४।।**

त्या जागी घन म्हणजे मोठा हतोडा किंवा दूसरे औजार वा पकडण्याकरीता सांड्सी तेथे आत काहीही नाही अशा जागी जीवाला कशाप्रकारे गढकर(घड्वून)बनविले?।।१४४।।

**घडे किम सीस बणावे नाक ।। किसी बिध नेण किया तें पाक ।।१४५।।**

आत मस्तक कोणत्या प्रकारे घड्वून तयार केले?नाक कशा तऱ्हेने बनविले?आणि कोणत्या प्रकारे डोळे,पाय बनविले?।।१४५।।

**बणाया हाथ घड़े किण घाट ।। बणाया होट किवी मुख बाट ।।१४६।।**

हे हात बनविले व कोणत्या घाटात घड्वून हात बनविले आणि तुम्ही ओठ बनविले, मुख बनवून मुखातून रस्ता बनविला. ।।१४६।।

**कहुँ मै राम सुणो करतार ।। किसी बिध जीभ बणाई सार ।।१४७।।**

मी रामजी तुम्हाला सांगतो,करतार तुम्ही ऐका,जीभ कोणत्या तऱ्हेने सजवून व्यवस्थीत बनविली. ।।१४७।।

**किया किम केस किसी बिध स्याम ।। बणाया खून निमो सत राम ।।१४८।।**

तुम्ही हे केस म्हणजे बाल बनविले आणि केसांचा रंग काळा कोणत्या तऱ्हेने बनविला? केश खूप छान बनविले(आपण केस काळे बनविले आणि रक्त लाल बनविले)तर सत्तराम आपल्याला नमस्कार आहे.।।१४८।।

**चडाया रंग किया सब स्याम ।। ध्रग जिण जाग खुले तिण वाम ।।१४९।।**

आणि साऱ्या शरीरावर रंग चढवून आपण स्वामी सर्व बनविले ज्या जागेवर ठेवले होते त्या जागेवर उघडले. ।।१४९।।

**नहिं को चोट न देवे घाव ।। किया हरि केम बडा मुझ चाव ।।१५०।।**

हे शरीर घडविण्यात कोठेही कोणत्याही औजाराची चोट(मार)दिला नाही आणि कोठेही औजाराने घाव नाही केला.हे तुम्ही औजारा शिवाय कसे शरीर घड्वून बनविले याचे मला आश्चर्य होते? ।।१५०।।

**बणाया सीस धऱ्या सिर कान ।। किसी बिध पाख बणाया जान ।।१५१।।**

तुम्ही डोके बनविले आणि डोक्याच्यावर कान बनवून ठेवले.हे सर्व आपण हे कान दोन्ही

बाजूला वेगवेगळे कोणत्या तऱ्हेने बनविले? ।।१५१।।

**नमो तुज स्याम सनेपी नाय ।। इसी बिध बात कियो मोहि जाय ।। १५२ ।।**

तुम्हाला स्वामी नमस्कार आहे.सनेपी( )या तऱ्हेने ह्या गोष्टी मला करुन दिल्यात. ।।१५२।।

**बणाया अेक तमे असतुल ।। लगाया खंभ उभे सत्त मूल ।।१५३।।**

तुम्ही तर माझे एक स्थुल शरीर बनविले.शरीराला दोन खांब लावले. ।।१५३।।

**बणाया पाँव किसि बिध जोड ।। लखावे अेक चोवीसुं ठोड ।।१५४।।**

हे पाय बनवून कोणत्या तऱ्हेने जोडले?हे सर्व जोड चोवीस जागांवर समजण्यात येते. ।।१५४।।

**किया ते केम कोहो करतार ।। बणाया देवल देव मुरार ।।१५५।।**

करतार हे आपण कसे बनविले?ते मला सांगा?आपण हे देऊळ म्हणजे मंदिर बनवून या मंदिरात राहणारा देव कसा बनविला? ।।१५५।

**धऱ्या ते देव किसी बिध मांह ।। फिरे सो धाम दवादस जाह ।।१५६।।**

तुम्ही याच्या आत देव आणून कसा ठेवला?आणि श्वास बारा जागी जाऊन फिरतो आहे.।।१५६।।

**बणाया महल अनोप अजब ।। रमे तुं मांहि निसो दिन रब ।।१५७।।**

हा असा अनूप ज्याला उपमा दिली जाऊ शकत नाही.असा अजब महल आपण बनविला या महलात आपण रात्रंदिवस हे रब(रामजी)रमण करुन राहीले आहे. ।।१५७।।

**केता सो देव तुमारे पास ।। जोवे कोहो कुण गहे को बास ।।१५८।।**

आणखीही ह्या शरीरामध्ये आपल्याजवळ किती देव आहे.याच्यात बघणारा कोण आणि सुगंध कोण घेतो? ।।१५८।।

**सुणे सो स्याम झरोखा मांहि ।। कहो ओ कूण अनो जळ खाय ।।१५९।।**

या खिडक्यांमधून ऐकणारा कोण?आणि हे अन्न,पाणी खाणारा कोण आहे?हे मला सांगा. ।।१५९।।

**झरोखा दोय सुणे को बात ।। दुजी हरि धाम न जाणी जात ।।१६०।।**

दोन झरोक्यातून गोष्टी ऐकते आहे.ही दुसऱ्या जागेपासून गोष्ट ऐकली जात नाही. ।।१६०।।

**बणाया देवळ देव मुरार ।। झरोखा मांय अबे मिल चार ।।१६१।।**

तुम्ही देवल म्हणजे मंदिर बनवून त्यात मुरारी देव बनविला.या खिडक्यांमध्ये आता मिळून चार ऐकणारा,बघणारा,सुगंध घेणारा आणि रस चाखणारा बनविला. ।।१६१।।

**कहो कुण देव झरोखा मांहि ।। किसी बिध रूप गहे हरि जाय ।।१६२।।**

सांगा कोणत्या झरोख्यात कोणता देव आहे?तर कोणत्या तऱ्हेने हे रुप धारण करुन घेतो.(एक वेळ बघितलेला मनुष्य पुन: भेटला तर त्याला ओळखून घेतो.बघितलेले स्थळ वा अक्षर वा वस्तु ओळखून घेतो तर याचे रुप कसे पकडून घेतो की त्याला विसरत नाही.)।।१६२।।

**लेवे कुण वास सुवास सरीर ।। कोहो कुण धाम बनाई ह ईस ।।१६३।।**

आणि हा सुवास म्हणजे सुगंध घेणारा शरीरात कोणता देव आहे सांगा?कोणता धर्म ईश्वरा करीता बनविला आहे? ।।१६३।।

**तमे तो अेक बणाया जीव ।। नखे चख मांहि रमे किम पीव ।।१६४।।**

तुम्ही तर या शरीरात फक्त एकच जीव बनविला तरी हा नखापासून डोळ्यांत सर्व शरीरात कोणत्या तऱ्हेने रमतो हे मला सांगा? ।।१६४।।

**गहे सत्त बात सबे संग जाय ।। किया षट धाम झरोखा मांय ।।१६५।।**

आणि सत्य गोष्ट धारण करतो आणि सर्वांसोबत जातो.याप्रकारे सहा जागेवर झरोखे बनविले. ।।१६५।।

**सुणे जिण धाम न देखे रूप ।। गहे जाहाँ बास नहि षट चूप ।।१६६।।**

ज्या जागेवरुन ऐकतो म्हणजे कानाने ऐकतो त्या जागेवरुन(कानाने)रुप बघता येत नाही आणि ज्या जागेने म्हणजे नाकाने वास घेतो या जागेतून सहा प्रकारचे रस(खारट, आंबट,तिखट,फिकट,गोड,अनूप)नाकाने ओळखले जात नाही. ।।१६६।।

**किया ते धाम नियारा सोय ।। याहाँ की बात उवाँ नहि होय ।।१६७।।**

तर हे स्थान आपण सर्व बघण्याचे,ऐकण्याचे,सुगंध घेण्याचे आणि रस चाखण्याचे वेगवेगळे बनविले.येथिल गोष्ट तेथे होत नाही.(कानाने ऐकतो ते ऐकण्याचे काम डोळ्याने होत नाही.नाकाने सुगंध घेतो ते सुगंध घेण्याचे काम मुख आणि जीभ करु शकत नाही) याप्रकारे येथिल गोष्ट तेथे होत नाही. ।।१६७।।

**हे घट अेक कदू जो माय ।। अेकण धाम सबे नहि खाय ।।१६८।।**

हा घटात एकच आहे की,आत दुसरा कोणी आहे?आत एकच आहे तर तो सर्वांचा (ऐकणे,बघणे,सुगंध घेणे,रस चाखणे)हे सर्व एकाच जागेवरुन का नाही करता येत? (जर शरीरात एकच आहे तर ऐकण्याचे काम कानांने,बघण्याचे काम डोळ्यांनी,सुगंध घेण्याचे काम नाकाने रस चाखण्याचे काम जिभेने आणि स्पर्शाचे काम कातडीने (त्वचेने)असे वेगवेगळे का घ्यावे लागते?आणि शरीराच्या कोणत्या ही स्थानाने का नाही घेतले जात?) ।।१६८।।

**न्यारा देव क अेकी होय ।। कहुँ मै पीव बतावो मोय ।।१६९।।**

हे सर्व इंद्रियांचे देव वेगवेगळे आहे का एकच आहे. हे मी विचारतो आपण माझे मालक

मला सांगा. ।।१६९।।

**किया ते केम किसी बिध राम ।। गहेसो वास बिधो बिध स्याम ।।१७०।।**

हे रामजी तुम्ही हे कोणत्या तऱ्हेने कसे बनविले आहे.की नाक आहे जे तो वेगवेगळ्या प्रकारची सुगंध म्हणजे अनेक प्रकारचे सुगंध घेऊन परीक्षा करुन सांगून देतो.।।१७०।।

**किया सो घाट अनेक अपार ।। काहाँ तुं स्याम बिराजण हार ।।१७१।।**

तुम्ही या शरीरात अनेक अपार घाट बनविले आहे.तर आपण स्वामी या शरीरात कोणत्या जागेवर राहतात? ।।१७१।।

**किया तें सूत अनेख अजात ।। घड़ि घट मांहि केती ते बात ।।१७२।।**

तुम्ही अनेक प्रकारचे सूत बनविले(      )या घाटावर किती गोष्टी घडविल्या आहेत. ।।१७२।।

**बणाया देवळ देव असंख ।। किया ते सहर भड़ा भड़ पेख ।।१७३।।**

तुम्ही असंख्य देऊळ बनविले आणि त्या देवळात म्हणजे शरीरात असंख्य देव(जीव) बनविले आणि आपण मोठ मोठे शहर बनविले त्याच्यात जबरदस्त योध्दे बघितले. ।।१७३।।

**बणाया सेंग अनोप अपार ।। बसे मंझ गाडर गायर नार ।।१७४।।**

तुम्ही सर्व काही अनूप,अपार(पार नाही)इतके बनविले.त्याच्यात बकरी,गाय,सिंह हे राहतात. ।।१७४।।

**सबे सो सहर बना बिच होय ।। तुमे बिन सहर न देख्यो कोय ।।१७५।।**

हे सर्व शहर(शरीर)वनाच्या मध्ये आहे.परंतु तुमच्या शिवाय कोणते ही शहर(शरीर) बघितले नाही. ।।१७५।।

**बडा सो साह रिखि बन माय ।। बसे सो सहर सूनि दिस नाय ।।१७६।।**

मोठ-मोठे सावकार शहरात(शरीरात)राहतात.आणि ऋषी वनात राहतात असे शहर (शरीर)बसत आहे.या शरीरात खाली दिशा कोणतीच नाही. ।।१७६।।

**लगी मंझ हाट चोरासी बीस ।। अबे फिर तीन बणाई ईस ।।१७७।।**

या शहरात म्हणजे शरीरात एकशे चार दुकान लागली आहेत.आता आणखी ही तीन ईश्वर ने बनविली. ।।१७७।।

**किया तें सहर सज्या बोहो भाय ।। धरी तें चीज अनेकु माय ।।१७८।।**

असे हे शहर बनवून शहराला छान सजविले.या शहरात(शरीरात)अनेक वस्तु आपण ठेवल्या.।।१७८।।

**बसाया सहर अनोप अग्याद ।। किया मंझ चोर बसाया साद ।।१७९।।**

असे तुम्ही शहर(शरीर)अनोप(ज्याची उपमा दिली जाऊ शकत नाही)असे अगाध अथांग शहर(शरीर)वसविले.याच्यात चोर ही आणि साधु ही वसविले. ।।१७९।।

**बणाया कोट किला करतार ।। किवी बोहो बाड़ बना की सार ।।१८०।।**

याच्यात कोट आणि किल्ले हे कर्तार तुम्ही बनविले.आणि खुपशे वाडे बनविले आणि वनाची व्यवस्था केली. ।।१८०।।

**बणाई तीन बड़ी मंझ पोंल ।। पडे नित सहर अचूकी रोल ।।१८१।।**

आणि याच्यात तीन मोठे दरवाजे बनविले.या शहरात नेहमी उत्पात अचूक पडून राहिला आहे.।।१८१।।

**चडे इकनार बडी भै भीत ।। लिया तिण दाणुं सबे नर जीत ।।१८२।।**

त्याच्यात एक स्त्री चढाई करते.ती फार भयभीत(घाबरलेली)असते.त्या स्त्रीने सर्व मनुष्य आणि सर्व दानव(राक्षस)या सर्वांना जिंकून घेतले. ।।१८२।।

**घडियेक चार पकी मिल दोय ।। अेते मेहेर हलावे जोय ।।१८३।।**

ती चार घडी म्हणजे पक्के दान तास इतक्या वेळात शहर(शरीर)शोधून हाकलून देते. ।।१८३।।

**हुवे सब लीन अधिन अनाथ ।। बडा मझ भूप तिके पण साथ ।।१८४।।**

तिच्याशी सर्व लीन होऊन तिच्या आधीन होऊन सर्व अनाथ म्हणजे गरीब होऊन जातात. याच्यात मोठा राजा(मन)हा ही तिच्या सोबत होऊन जातो. ।।१८४।।

**इसी दोय नार बणाई स्याम ।। नितो नित सहर बिंदुसे राम ।।१८५।।**

याप्रकारे स्वामी ने दोन स्त्रीयाँ बनविल्या.नित्य नित्य या शहराचा म्हणजे शरीराचा विध्वंस करते. ।।१८५।।

**नहिं बस तीन जोरावर नार ।। किया सब खाँच पचीसुं हुँ लार ।।१८६।।**

ह्या स्त्रीयाँ खुप जबरदस्त आहेत.ह्या तिघांच्या ही वश होत नाही.यांनी पाच(   )आणि पंचविस प्रकृतीला खेचून आपल्या सोबत करुन घेतले. ।।१८६।।

**बचे नहि अेक बिना तुझ स्याम ।। करे अे नार अनिता हां काम ।।१८७।।**

यांच्यातुन स्वामी तुमच्या शिवाय एकही वाचत नाही.ह्या स्त्रीयाँ अनीतीचे काम करतात. ।।१८७।।

**सुणो जगदीस संभाळो मोय ।। लुटिजे सहर तुमारो हो जोय ।।१८८।।**

हे जगदीश ऐका आणि मला सांभाळा.हे आपले शहर(शरीर)लुटले जात आहे ते बघा. ।।१८८।।

**धणी तुम आण बंधावो धीर ।। उलटया दाणुं बावन बीर ।।१८९।।**

मालक,तुम्ही येऊन मला धैर्य द्या.सर्व दानव (राक्षस) आणि बावन्न विर उलटून आले

आहे. ।।१८९।।

**करो हरि साय अजुणि हो नाथ ।। अबे बिष प्राण पडे हे हाथ ।।१९०।।**

(परमात्म्याला विनंती)आता हरी तुम्हीच माझी सहायता(मदत)करा.तुम्ही अयोनी (योनीत न येणारा)नाथ आहात.आता हा माझा प्राण विषयांच्या हातात पडत आहे. ।।१९०।।

**लुटिजे हे सहर बडो अचगत ।। अनन्ता मांय बणायो सत्त ।।१९१।।**

हे शरीर लुटले जात आहे.मोठे अचंगत या अनंतात सत्त बनवून आहे. ।।१९१।।

**किया तें ठाठ मंडाण अपार ।। समझे सेंग सने संग नार ।।१९२।।**

तुम्ही अनेक थाट आणि अपार(वेगवेगळ्या)मांडण्या म्हणजे रचना बनविल्या आहे.हे सर्व समजते.ह्या सोबतच्या स्त्रीया सने होती(प्रीती मध्ये)समजून सर्व स्त्री-पुरुष संग करतात. ।।१९२।।

**किया अेक साह बड़ा करसाण ।। ढली एक बालद नगर मंझ आण ।।१९३।।**

एक मोठा सावकार आणि एक मोठा किसान बनविले.एक बालद(मालाच्या पोत्यांनी लदलेले बैल)येऊन नगरात पडाव केला.(जे खाल्ले-पिल्ले ते सर्व पोटाच्या नगरात (नाभीमध्ये)येऊन पडले.।।१९३।।

**बिणजे सेठ करे बोपार ।। चले जुग नायक सोदो हार ।।१९४।।**

तेथे नाभीपासून सेठ वाणिज्य(व्यापार)करतो.तेथून नायक सौदा हारुन देतो.।।१९४।।

**संभाळे गुण गिणे सो दाम ।। अबे सो नायक चेतन राम ।।१९५।।**

बोरी(पोती)सांभाळणे आणि दाम मोजतो आहे.आता तो नायक कोण आहे?म्हणाल तर चैतन्य राम. ।।१९५।।

**सरे अब बात न काँई स्याम ।। दिरावो माल माया सो राम ।।१९६।।**

आता स्वामी कोणतीही गोष्ट सरकत नाही.रामजी तो माल-माया सर्व दाखवा.।।१९६।।

**पुकारे तुज सुणो हरि राय ।। गमाया माल दिरावो आय ।।१९७।।**

माझा जीव हे हरी तुला पुकारत आहे.हे हरी मी माल गमावला आहे.ते दिरावो. ।।१९७।।

**बणाया ठग बडावे ताल ।। बंधी तें मोर घरोघर माल ।।१९८।।**

आपण मोठे ढग बनविले आणि वेताळ बनविले.आपण मोर बांधला आणि घरोघरी तोरण बांधले. ।।१९८।।

**बिणजे साह घरोघर राम ।। मुदे सो अेक बणायो धाम ।।१९९।।**

सर्व सावकार घरोघरी वाणिज्य(व्यापार)करतो.सर्व नाडी-नाडीला रस देतो आहे. महत्वाचा एक धाम(ठिकाण)नाभीमध्ये बनविले(तेथून सर्व रस सर्व शरीरात नाड्यांच्या

-द्वारे पोहचवितो आहे.) ।।१९९।।

**बिचे सो हाट अदार अनेक ।। बिणजे साह सुं जाणु सेख ।।२००।।**

त्याच्यात बाजार आणि अनेक आधार बनविले.तेथे सावकार वाणिज्य करतो आहे आणि उरलेला माल जाणतो आहे. ।।२००।।

**बिसावे चीज मोलावे जोय ।। घरोघर राम पुंचावे लोय ।।२०१।।**

तो वस्तु खरेदी करतो आणि पाहून-पाहून किंमत ठरवतो आणि मग त्या वस्तु घरा घरात(घरोघरी)लोग(नाड्या)पोहचवतात. ।।२०१।।

**निमो तुं राम धिनो करतार ।। बणाया जुग भलो संसार ।।२०२।।**

तुम्ही परमात्मा राम नमस्कार आहे.कर्तार आपण धन्य आहे.आपण हे जग आणि संसार खुप छान बनविला.(बनविले) ।।२०२।।

**रमे सो मांय किया बोहो रंग ।। धऱ्यो सत्त पेम बणायो भंग ।।२०३।।**

त्याच्यात तुम्ही खेळतात आणि खुप तऱ्हेने रंग करतात आणि त्याच्यात प्रेम ठेवले आणि भंग बनविले. ।।२०३।।

**ध्रगो नर नार नियारा नाँव ।। कहो कोई सेर बण्यो कोई गाँव ।।२०४।।**

स्त्री आणि पुरुष असे वेगवेगळे नाव ठेवले.कोठे काही शहर तर काही गाव बनविले. ।।२०४।।

**पिछाण्या तोहि अबे जगदीस ।। तुंई नर नार पसुं तुई ईस ।।२०५।।**

आता जगदिश तुम्हाला मी ओळखले.तुम्हीच स्त्री आहे,तुम्हीच पुरुष आहे.तुम्हीच तुम्ही पशु आहे आणि तुम्हीच सर्वांचे ईश्वर आहात. ।।२०५।।

**किया सुख धाम बणाया राज ।। धऱ्यो तुं रूप सुखा के काज ।।२०६।।**

आणि तुम्हीच अनेक सुखांचे अनेक धाम(ठिकाण)बनविले आणि राज्य बनविले.तुम्ही ब्रम्ह असून पाच इंद्रियांचे सुख घेण्याकरीता हे रुप धारण केले. ।।२०६।।

**किया सो पेम बण्या रस कूप ।। तुमे तुम काज बणाई चूप ।।२०७।।**

आणि येथे येऊन प्रेम बनविले आणि रसाचे कूप(विहीर)बनले.तुम्ही तुमच्या करीताच चतुराईने बनविले. ।।२०७।।

**किया सो काम सरीद सुनाथ ।। माया मंझ राम लथो बस साथ ।।२०८।।**

तुम्ही सर्व काम बनविले.(पाच इंद्रिय आणि पाच कर्मेंद्रिय यांच्यापासून सर्व काम होते.)तुम्ही मायेत मायेसोबत लथोपथ म्हणजे ओतप्रोत होऊन गेले. ।।२०८।।

**धऱ्या देह रूप बणाया घाट ।। किवी सुख सीर पिणे की बाट ।।२०९।।**

तुम्ही या देहाचे स्वरुप धारण करुन घाट बनविले आणि सुखाची खीर पिण्याचा रस्ता म्हणजे इंद्रिय बनविले. ।।२०९।।

**पियो सो आप नहि कोई ओर ।। तुमे सब जाण बणाई ठोड ।।२१०।।**

ही सुखाची खीर पिणारा आणखी दूसरा नाही आहे.तुम्हीच सर्व जाणून सर्व जागा.(इंद्रियांचे रस घेण्याकरीता)बनविल्या. ।।२१०।।

**ध्रगा गुण तांहि तुमे जगन्नाथ ।। सबे सुख दुख तुमारे हाथ ।।२११।।**

त्या इंद्रियांचे वेगवेगळे गुण तुम्ही जगन्नाथ संसाराचे मालक ठेवले आणि सर्व सुख आणि दु:ख तुमच्याच हातात आहे. ।।२११।।

**किया सब ठाम बिचार बिचार ।। चाहिजे तोहि जकी बिध लार ।।२१२।।**

तुम्ही सर्व भांडे,ठाम(स्थान)विचार करुन बनविले.तुम्हाला जे हवे,जी विधी तुमच्या सोबत हवी त्याप्रमाणे तुम्ही करुन घेतले. ।।२१२।।

**बिना तें काम किया नहिं कोय ।। बणाया घट अनेका लोय ।।२१३।।**

तुमच्या शिवाय काम कोणी(दूसऱ्याने)काही ही केले नाही.तुम्ही अनेक घट बनविले आणि अनेक लोक बनविले. ।।२१३।।

**नमो करतार नमो जगदीस ।। सुधारण काम बिसवा बीस ।।२१४।।**

कर्ता पुरुष तुम्हांला नमस्कार आहे.जगाचे ईश तुम्हाला नमस्कार आहे.तुम्ही सर्वांचे बीस बिसवे म्हणजे एकशे एक प्रतिशत काम सुधारणारे आहात. ।।२१४।।

**नमो निरलंब निराला निचंत ।। नमो सत्त स्याम सबे दु:ख जीत ।।२१५।।**

तुम्ही निरालंब,निराळे म्हणजे सर्वापेक्षा वेगळे निश्चित राहणारे तुम्हाला नमस्कार आहे. तुम्ही सतश्याम सर्व दु:खांना जिंकणारे तुम्हीस नमस्कार आहे. ।।२१५।।

**नमो निराकार आकार बिनंगङ ।। नमो तत रूप नहिं तुझ संग ।।२१६।।**

निराकार म्हणजे बिना आकाराचे तुम्हांला नमस्कार आहे.तुम्ही तत्तरुपी आहात.तुमच्या सोबत कोणी नाही तुम्हाला अशांना नमस्कार आहे. ।।२१६।।

**नमो गुण ग्यान न पावे पार ।। बडा संत साध तुमारे लार ।।२१७।।**

तुमच्या गुणांचे ज्ञान आणि गुणांचा पार येत नाही.अशा तुम्हाला नमस्कार आहे.मोठ मोठे संत आणि मोठ मोठे साधु हे तुमच्या सोबत आहे.अशा तुम्हास नमस्कार आहे. ।।२१७।।

**डरे सो राव बडा रजपूत ।। किये तके माय इसां म सब सूत ।।२१८।।**

तुम्हाला राजा ही घाबरतो आणि मोठे राजपूत पण घाबरतात.तुम्ही आतून असे सर्व सूत (सारखे)करुन दिले. ।।२१८।।

**कहे तुं नायन देखे कोय ।। किसी बिध सेंग धुजावे लोय ।।२१९।।**

तुम्ही कोणास काही ही म्हणत नाही आणि तुम्हास कोणी बघतही नाही.तुम्ही कोणत्या तऱ्हेने सर्व लोकांना घाबरतात. ।।२१९।।

**डरे सब देव जखि जुग राह ।। नमो सत शाम करी किम राह ।।२२०।।**

तुम्हांस सर्व देव ही घाबरतात.राक्षस ही घाबरतात आणि सर्व संसार ही घाबरत आहे. सतस्वामी तुम्हास नमस्कार आहे.आपण हे कसे करत आहे. ।।२२०।।

**अेक सूं अेक बडा भै भीत ।। मारे सब स्याम आवे तुं चीत ।।२२१।।**

एका पेक्षा एक मोठे देव तसेच बलवान राक्षस आपसात खुप भांड्तात.परंतु हे सर्व बलवान देव तसेच राक्षस आपल्याशी(भयभीत)राहतात. ।।२२१।।

**अचंभो मोहि सुणो करतार ।। डरे सो कूण डरावण हार ।।२२२।।**

याचे मला आश्चर्य आहे.तुम्ही कर्तार ऐका याच्यात घाबरतो कोण आणि घाबरवतो कोण?।।२२२।।

**न देख्यो तोहि बिना को राम ।। लगाई बीच भुलाई स्याम ।।२२३।।**


हे रामजी,तुमच्या शिवाय घाबरणारा आणि घाबरवणारा कोणी दूसरा दिसत नाही.हे स्वामी,तुम्ही आमच्यात आणि तुमच्यात खुप भुल लावून दिली आहे. ।।२२३।।

**आयो सुख लेण धर्‍यो अवतार ।। गयो सुख भूल अनेक बिचार ।।२२४।।**

हे जीव परमात्म्याने बनविलेल्या मायेत पाच इंद्रियांचे पाची विषयांचे सुख घेण्याकरीता मनुष्य अवतार घेऊन आला आणि येथे अनेक विचारात पडून सतस्वरुपाचे वैराग्य ज्ञान सुख ही विसरुन गेला. ।।२२४।।

**पिया रस प्रेम रहो लपटाय ।। ताते अवगत सूजे काय ।।२२५।।**

येथे प्रेमाचा रस पिऊन प्रेमरसात मग्न होऊन राहीला आहे.त्याच्याने आता अविगत देव या जीवाला दिसत नाही.(दिसून नाही राहीला) ।।२२५।।



**गयो सुख भूल कहो ओ जीव ।। तजे बिष बाद तबे सत्त सीवे ।।२२६।।**

पाच विषयांच्या सुखात हा जीव अविगतला विसरुन गेला.ज्या वेळी(क्षणी) हा जीव पाच विषय रस त्यागन करेल त्या वेळी(क्षणी)जीव शिवच आहे. ।।२२६।।

**उठे सबे सेंग अनेक बुहार ।। तबे सत्त आप तुहिं तत्तसार ।।२२७।।**

जेंव्हा सर्व अनेक तर्‍हेचे विषय सुखांचा व्यवहार उठून जातील तेव्हा तुच(जीवच)सत म्हणजे ज्याच्या कधी नाश होणार नाही असा स्वत:(स्वयं)तत्तसार(ब्रम्ह)आहे.।।२२७।।

**भुल्या तुं राम बिषे पी जोय ।। किवी कल हाथ मिटे नहिं कोय ।।२२८।।**

आपण राम म्हणजे ब्रम्ह होऊन विषयांचे सुख घेण्यात विसरुन गेला आणि जे तुम्ही हाताने कल(कर्म)केले हे कर्म काही स्वत:ने मिटवले जात नाही. ।।२२८।।

**इसा सो कुण मिटावे हे आय ।। किया हर आप फेर्‍या नहि जाय ।।२२९।।**

असा दूसरा कोण आहे की,येऊन हे कर्म मिटवणार. हे सर्व तर्‍हेचे केलेले कर्म कोणा

कडूनही मिटवले जात नाही.(जसे जीवाने कर्म केले तसे त्याचे कर्म हरजवळ लिहीले जातात.।।२२९।।

**तमारा तुझ सांभळो सूत ।। तबे हरि आप बणे अवधूत ।।२३०।।**

तुमचे तुम्ही सूत( )सांभाळून घ्या.तेव्हा हरी आपण बनले अवधूत म्हणजे कर्म कापल्यावर जीव स्वयम्(स्वत:)भोगी प्रकृतीतून निघून हरी सारखे योगी प्रकृतीचा बनून जातो.(बनतो) ।।२३०।।

**किया सो आप अनेक बिचार ।। नीह जुग ओर उपावण हार ।।२३१।।**

या जीवानेच अनेक कर्म केले हे विचार करुन बघा.या जगात कर्माला उत्पन्न करणारा दूसरा कोणी नाही.(कर्म आपल्यानेच केल्याने उत्पन्न होतात)दूसऱ्याने केलेले कर्म आपल्याला होत नाही.ज्याचे त्याला होते.।।२३१।

**जाहाँ जुग जीव सुखावित होय ।। ताहाँ लग धाम न पावे कोय ।।२३२।।**

जो पर्यंत जीव संसारात विषयामध्ये सुखात लपटलेला असतो तोपर्यंत तो ब्रम्ह धामाला पोहचत नाही. ।।२३२।।

**तबे सुख स्वाद बणाया सोय ।। जबे हरि आप अमुरत होय ।।२३३।।**

तेंव्हा या जीवाने सुख आणि स्वाद सर्व बनविले.आधी(आदि)हा जीव स्वयम,अमुरत हरी म्हणजे जीवच होता म्हणजे काळाच्या मुखात न पड्णारा होता. ।।२३३।।

**सुखां के लेण धऱ्या आकार ।। बिना सुख दुख तुंहि करतार ।।२३४।।**

हा जीव ब्रम्ह होता.परंतु इंद्रियांचे सुख घेण्याकरीता,याने आकार धारण केला.सुख दु:खाशिवाय तर करतार एक तुच आहे. ।।२३४।।

**मिटावो आप अनेक ऊपाय ।। तुमारी ओर न मेटे आय ।।२३५।।**

तुम्ही अनेक उपाय करुन मिटवून द्या.तुमच्या शिवाय आणखी कोणी येऊन मिटवत नाही. ।।२३५।।

**बडो सो खेल अचंभो हो मोय ।। बिना तुम ओर कोहो कुण होय ।।२३६।।**

हा खुप मोठा खेळ केला आहे.याचे मला आश्चर्य होते.हे करणारा तुमच्या शिवाय कोण आहे?हे मला सांगा?।।२३६।।

**तिरे सो कूण तिरावण हार ।। बिना हरि कूण उतारे हे पार ।।२३७।।**

तिरणारा कोण आहे?आणि तारणारा कोण आहे?हरीच्या शिवाय पार उतरवणारा कोण आहे?।।२३७।।

**बतावे भेव सुणे संसार ।। मेंही जड जीव आप चेतावन हार ।।२३८।।**

भेद सांगणारा कोण आणि संसारात ऐकतो कोण?हरीच्या शिवाय पार उतरवणारा कोण आहे?।।२३८।।

**सुखां मे जीव हुवो प्रवाण ।। निरालो होय चेताऊँ आण ।।२३९।।**

या मायेच्या सुखात जीव अलमस्त(निश्चित)झाला आहे.मी या काळाच्या दुःखातून काढून बिना दुःखाचे सतस्वरुप सुखाचे महाअनुभव घेऊन राहीलो आहे.याप्रकारे जेव्हा जीवापासून निराळा होऊन हे जीव,तुला मी महासुख घेण्याची विधी समजावत आहे. ।।२३९।।

**लिया सुख दुख अनेक अपार ।। अबे तुं चेत सिरजण हार ।।२४०।।**

या जीवाने मायेच्या वासनांचे सुख आणि काळाचे दुःख अनेक तऱ्हेने भोगले.त्याचा वारपार नाही.अरे आता तर तु चेत म्हणजे हुशार होऊन जा.तु सिरजनहार ब्रम्ह आहेस म्हणजे तु मायेच्या किचड मध्ये पडला नसता तर तुच सिरजनहार ब्रम्ह आहे. ।।२४०।।

**तजो जुग जीव बिषे सब खोय ।। कहुँ मै आप निरालो होय ।।२४१।।**

तु संसारात सर्व पाच इंद्रियांचे विषय रस घेणे सोडून दे.तेव्हा संसारापासून तुझा जीवपना मिटून जाईल.मी स्वयं(स्वतः)संसारापासून वेगळे होऊन सांगत आहे.।।२४१।।

**संभाळो काय नहिं करतूत ।। तजो बिष बा दस जम का पूत ।।२४२।।**

तुम्ही तुमची करतुत सांभाळत का नाही?हे सर्व विषय वाद जे आहे.हेच यमाचे पुत्र आहे.(विषय वाद जे आहे ते यमाच्या दारात पकडून घेऊन जाणारे यमदूत आहेत.) ।।२४२।।

**ताहाँ निजधाम तमारो होय ।। चलो अब आप बताऊँ तोय ।।२४३।।**

जेथे तुमचा निजधाम आहे.(ब्रम्हपासून आले ते स्थान तुमचे निजधाम आहे)आता आपण चला.मी आपणास,आपले निजधाम सांगतो.(दाखवतो) ।।२४३।।

**ताहाँ तम रूप अरूप अलेख ।। जाहाँ सुख दुःख नहिं कोई पेख ।।२४४।।**

तेथे तुमचे रुप काहीच नाही.तेथे(ब्रम्हमध्ये)तुम्ही अरुपी म्हणजे तेथे तुम्हाला आजच्या सारखे मायेचे रुप राहत नाही.तेथे बिना रुपाचे आहात.तेथे अलेख आहात म्हणजे लिहिण्यात न येणारे(अलिखीत)आहात.तेथे संसारासारखे मायेचे सुख-दुःख काही ही बघण्यात येत नाही.।।२४४।।

**चलो अब धाम तजो आकार ।। बिना कुल ब्रम्ह मिल्यो नित्त कार ।।२४५।।**

आता तुम्ही हा आकार म्हणजे पाच तत्वाचा देह सोडून या.ब्रम्हधाम म्हणजे सतस्वरुप धामाला चला.तेथे तो त्या बिना कुळाच्या सतस्वरुप वैरागी ब्रम्हमध्ये जाऊन नित्य मिळून रहा.।।२४५।।

**बाजावो आप अमोल ई मांट ।। होता तुम नाथ अजूणी आँट ।।२४६।।**

तुम्ही तेथे जाऊन अमोल म्हटले जाल.आपण आधी अयोनीच होते म्हणजे(आधीपासून)

होते.जीवाचा जन्म झाला नाही. ।।२४६।।

**तजो जुग जीव तणो बोहार ।। मिलो घर आद तणो दरबार ।।२४७।।**

तुम्ही या संसाराचा जीवपनाचा व्यवहार सोडून द्या आणि आदि घरी जाऊन आधी (जेथून आले तेथे त्या)दरबारात मिळून जा. ।।२४७।।

**काहा तुम भूल रहया घर धाम ।। दिया दिल झूट बिकारा काम ।।२४८।।**

कोठे तुम्ही आपले घर आणि धाम ब्रम्ह म्हणजे सतस्वरुप धर्म धाम विसरुन राहीले आहे?तुमचे निजमन या खोट्या विकारात जोडून दिले. ।।२४८।।

**तजो कुळ जात सगाई नेम ।। छाडो सुख दुख तणा सब पेम ।।२४९।।**

आता आपले कुळ(होणकाळ ब्रम्ह)आणि जात(होणकाळ ब्रम्ह)सगाई(होणकाळ ब्रम्ह मध्ये मिळणे)यांचे सर्व नियम सोडून द्या आणि सर्व मोयेचे सुख-दु:ख सोडून मायेच्या सुखांशी प्रेम ठेवू नका. ।।२४९।।

**बिछोड़ो तत उपाया सोय ।। मिल्यो घर आद तुमारो जोय ।।२५०।।**

ज्या तत्वाने तुम्ही वेगळे झाले.ज्या ठिकाणापासून तुम्ही उत्पन्न झाले.त्या स्थानाचे सर्व उपाय सोडून द्या.तुम्ही आपले आदि घर पाहून त्या घरात जाऊन मिळून जा. ।।२५०।।

**तजो गुण तीन मिटावो धात ।। करो तम सोध तमारो साथ ।।२५१।।**

तीन गुण(रजोगुण,तमोगुण,सतोगुण)या त्रिगुणी मायेला सोडून आणि सप्त धातूंचे बनलेले शरीर याला धातू सारखे मिटवून द्या. जे नेहमी तुमच्या सोबत राहते त्याचा शोध करा. ।।२५१।।

**पचिसुं मेट हुवो करतार ।। काहाँ तुं जीव पणो रहे धार ।।२५२।।**

पंचवीस प्रकृतींना मिटवून आपणच करतार बनून जा.कोठे तुम्ही जीवपना धारण करत आहे?।।२५२।।

**लिया सुख स्वाद सबे बिष जोय ।। अबे तुं छाड़ घणा दिन होय ।।२५३।।**

तुम्ही सर्व विषयांचे सुख आणि स्वाद घेऊन-घेऊन बघून घेतले.आता तुम्ही या विषयांचे सुख सोडून द्या.या विषयांचे सुख घेत घेत खुप दिवस होऊन गेले. ।।२५३।।

**गया जुग जोय असंखुँ बीच ।। रचो बोहो भाँती माया जुग कीच ।।२५४।।**

बघा,तुम्हाला उत्पन्न झाल्या दिवसापासून असंख्य युग व्यतीत होऊन गेले.याच्यात तुम्ही या मायेच्या किचडमध्ये रचून म्हणजे खुश होऊन या मायेच्या किचडमध्ये खरे सुख विसरत आहे. ।।२५४।।

**कियो एक खेल तमासो सोय ।। अबे बस काहा उसी के होय ।।२५५।।**

तुम्हीच हे एक पाच तत्वाच्या संगाने (देह धारण करुन) एक खेळ केला.आता तुम्हीच

खेळ करुन खेळाच्या वश होत आहे. ।।२५५।।

**तमे तत्त रूप अरूप अनाथ ।। माया अंग आप बणायो हाथ ।।२५६।।**

तुम्ही तर ततरुपी,अरुपी,अनाथ म्हणजे तुझ्यावर कोणी नाथ नाही म्हणजे मालक नाही असा आहे.तुम्ही तुमच्या हाताने मायेचे अंग(पाच तत्वाचा देह)बनवून याच्या आत आला. ।।२५६।।

**अबे बस काय हुयो करतार ।। रहयो संग हाथ बणायर लार ।।२५७।।**

आता तुम्ही कर्तार असूनही यांच्या वश का होत आहे? तुम्ही तुमच्या हाताने बनून यांच्या संगात होऊन राहीले आहे. ।।२५७।।

**तजो अब मोह उपावण हार ।। बण्या तुम जीव इनुकी लार ।।२५८।।**

आता यांचा मोह सोडून द्या.उत्पन्न करणारी त्रिगुणी माया आणि होनकाळ ब्रम्हला सोडा.तु यांच्या संगतीने जीव बनत आहे. ।।२५८।।

**जोवे संत बाट तुमारी धाम ।। मिलो सुख साज तमारा काम ।।२५९।।**

तुझी या धामात सर्व संत वाट बघत आहे.आता तु साधना करुन त्या सुखात मिळून जा. हे तुझे काम आहे. ।।२५९।।

**हे सत बोट तुमारी स्याम ।। आया सो गेल बिचारो राम ।।२६०।।**

तो तुझा सत रस्ता तुझा स्वामीच्या जवळ जाण्याचा आहे.ज्या रस्त्याने तु आला त्या रस्त्याचा विचार कर. ।।२६०।।

**सुणे सो कोण कहे समझाय ।। मेरे उर अेह तमासा माय ।।२६१।।**

जीव शिष्य बनून सतगुरुस विचारतो की,हा ऐकणारा कोण आहे?आणि समजावून सांगतो तो कोण आहे?माझ्या हृदयात हा तमाशा आहे.।।२६१।।

**बिना हरि ओर दूजो नहि कोय ।। इत उत अेक बतावो मोय ।।२६२।।**

तुमच्या शिवाय हरी दूसरा कोणी ही नाही.येथे आणि तेथे एकच आहे.असे आपण मला सांगतात. ।।२६२।।

**मेहि सतरूप अलेख कहाय ।। भजुं अब कोण मिलुँ काहाँ जाय ।।२६३।।**

शिष्य सतगुरुला सांगतो की,मीच सतस्वरुप आणि मीच अलेख म्हणवतो.आता मी कोणाचे भजन करु आणि कोठे जाऊन कोणात मिळू? ।।२६३।।


**बिना मुझ ओर बतावो मोय ।। भजु मै ताहि मिलु दिल जोय ।।२६४।।**

शिष्य सतगुरुंना म्हणतो की,माझ्या शिवाय आता दुसरा कोण आहे?ते मला सांगा? माझ्या शिवाय दुसरा कोणी सांगा की,मी त्याचे भजन करु.त्याच्याशी मन लावून, त्याला पाहून त्याच्यात मिळू. ।।२६४।।

**माया सब रूप हमारो होय ।। बिना ब्रम्ह ओर न देख्यो कोय ।।२६५।।**

ही सारी माया जी आहे ती तर माझेच रुप आहे.माया उत्पन्न करणारे मी ब्रम्हच्या शिवाय दुसरे कोठे ही काही ही बघितले नाही. ।।२६५।।

**बतावो आण कहो समझाय ।। माया बिन ब्रम्ह कहो कुण थाय ।।२६६।।**



हे येऊन मला सांगा आणि मला समजावून सांगा.की मायेच्या पलिकडे ब्रम्ह कोण आणि कसा आहे. ।।२६६।।

**भजु दिन रेण अखण्ड अलोय ।। उभे बिन ओर बतावो मोय ।।२६७।।**

मी रात्रंदिवस अखंड त्याचे भजन करेल.या दोघांच्या शिवाय म्हणजे माया आणि ब्रम्हा शिवाय दुसरा मला सांगा. ।।२६७।।

**माया बिन ब्रम्ह न्यारा न अेह ।। काहा सोई इंद्र काहा हरि देह ।।२६८।।**

मायेपासून ब्रम्ह निराळा नाही.काया तर इंद्र काय तर तो हरी(विष्णू)तसेच काय तर सर्वांचे शरीर सर्व शरीरात जीव ब्रम्ह आहे.शरीर हे माया आहे.याप्रकारे शरीररुपी मायेच्या शिवाय ब्रम्ह नाही. ।।२६८।।

**हुति जब माहि बणाया आण ।। अबे हम इन्द्र बेठाया जाण ।।२६९।।**

ही माया त्या ब्रम्हमध्ये होती तेव्हा त्याने आणून माया बनविली.(ब्रम्हमध्ये माया नसती तर कोठून माया बनविता(बनविली असती?)आता आम्ही जो इंद्र बसविला.तो इंद्र माया ब्रम्हमध्ये होता म्हणून बनविला. ।।२६९।।

**बिना हम ओर न देख्यो कोय ।। सबे अंग रूप हमारा होय ।।२७०।।**

माझ्या शिवाय दुसरा मी कोणी ही बघितला नाही.सर्व अंग म्हणजे शरीर आणि सर्व रुप म्हणजे स्वरुप हे सर्व माझेच आहे. ।।२७०।।

**हुता हम मांहि सबे जम काळ ।। तबे हम आण पसाऱ्या जाळ ।।२७१।।**

हे सर्व यम आणि काळ हे सर्व माझ्या आतच होते.हे माझ्या आत होते तेव्हा मी हा सर्व जाळ आणून फैलवला.(पसरविला) ।।२७१।।

**माया हम माय इसी बिध लार ।। उपनी नीरजले पिणियार ।।२७२।।**

ही माया मध्ये याप्रकारे सोबत आहे.जसे पाण्यात बुड्बुडा उत्पन्न होतो तशी ही माया माझ्या मध्ये माझ्या सोबत आहे. ।।२७२।।

**छाडया सबे घाट अभुषण जोय ।। माया बिध संग अेसी बिध होय ।।२७३।।**

सर्व घाट घडलेले आणि आभूषण म्हणजे दागिने यांचे मूळ एक धातुच आहे.हे सर्व बघून सोडून दिले.याप्रकारे मायेची विधी सोबत आहे. ।।२७३।।

**घडे तब रूप दिखावे आय ।। भांजे तिण बेर मे हे सब जाय ।।२७४।।**

या धातुला घडवून तयार केले.तेव्हा त्याचे रुप वेगळे दिसायला लागले.या सर्वांना पुन्हा पुन्हा मोडून तोडल्याने त्याचे म्हणजे अवजारांचे किंवा दागिन्यांचे रुप मिटून जाते.

।।२७४।।

**माया हम एक सुणो सत्त भेव ।। अबे मुज ओर बतावो देव ।।२७५।।**

माया आणि आम्ही एकच आहे हा सत भेद ऐका.आता मला दुसरा देव सांगा.।।२७५।।

**सुणो सत्त बात बताऊँ तोय ।। बिना तुम देव न दूजो कोय ।।२७६।।**

सतगुरु उत्तर देतात की,ऐका खरी गोष्ट मी तुम्हाला सांगतो की,तुमच्या शिवाय दुसरा देव कोणीही नाही. ।।२७६।।

**करूं मै न्याव तुमारा जाण ।। सिरे तम देव पडिजे खाण ।।२७७।।**

सतगुरु शिष्याला उत्तर देतात की,आता मी तुमचा न्याय करतो ते समजा तुम्ही श्रेष्ठ आहात आणि खाणीत जाऊन पड्ले(तुम्ही ब्रम्हमधून आलेले ब्रम्ह आहात)परंतु ज्या ब्रम्हमधून आपण आलात त्या ब्रम्हमध्ये जाऊन मिळाल तर जसे धातु ज्या खाणीतून आला त्या खाणीत जाऊन मिळाल्या सारखे होईल.जसे धातु आधी सारखे आणखी ही परत येऊन जाईल आणि तो धातु आगीत तापविला जाईल.ज्या खाणीतून आधी आला त्याच्यात जाऊन धातुच्या मिळाल्याने त्याचे आगीत तापने,गळणे आणि हतोडा, घनची मार सुटणार नाही.असेच ब्रम्हतून आलेल्या जीवाचे ब्रम्हमध्ये जाऊन मिळाल्याने जीवाचे केलेले कर्म ब्रम्हमध्ये मिळाल्याने कर्म मिटत नाही.ब्रम्हमध्ये कर्म भोगले ही जात नाही आणि ब्रम्हमध्ये राहून जीवाच्या मनात पाच इंद्रियांचे सुख घेण्याची इच्छा नेहमी बनलेली असते आणि पाच इंद्रियांचे सुख पाच तत्वच्या देहाशिवाय मिळत नाही. याकरीता हा जीव पाच इंद्रियांचे सुख घेण्याकरीता देह धारण करुन येतो.तेव्हा या जीवाचे आधी केलेले कर्म जीवांच्या सोबतच आईच्या(मातेच्या)गर्भात शरीराच्या सोबतच येऊन जातात.ते कर्म पुढे प्रारब्धच्या रुपात जीवाला भोगावे लागतात.त्या कर्मांना भोगण्यात चांगल्या कर्मांचे सुख आणि वाईट कर्मांचे दुःख जीवाला भोगावे लागते. ।।२७७।।

**धन्या तब रूप बंध्या परवाण ।। नितो नित खाण बधे नहिं जाण ।।२७८।।**

जेंव्हा तुम्ही(आपण)स्वरुप धारण केले.तेव्हा तुम्ही(कर्माच्या प्रमाणाने)परमाणु एकत्र करुन तुमच्या सर्व जीवांचे शरीर बांधले गेले.नेहमी–नेहमी खाणीतून काढून बांधले जात नाही. ।।२७८।।

**लगे बोहो ताव अनेक अपार ।। बिके जुग जीव घरोघर बार ।।२७९।।**

त्या धातुला अनेक तऱ्हेचे नाव देतात आणि खाणीतून धातु काढल्यानंतर जसे घरा घरात जातो.तसेच हे जीव ब्रम्हतुन निघुन घराघरात जाऊन खपतात. ।।२७९।।

**भळे बोहो फेर अनेकु होय ।। दुखी बोहो रूप घडिजे जोय ।।२८०।।**

परत त्या धातुची खुप वेळा काया पलटून वेगवेगळ्या वस्तु बनून त्याचे वेगवेगळे नाव

ठेवले जातात आणि एका वस्तुपासून दुसरी बनवते वेळी त्या धातुला हातोड्याने मारतात.त्याच प्रकारे जीवाच्या देहाचे रुप बदलते वेळी,धातु सारखे होते.जेव्हा धातुला दुसरे रुप देतात.तेव्हा धातुला खुप दुःख सहन करावे लागते.तसेच जीवांचे दुसरे रुप बनवतात.तेंव्हा(वेळी)धातु सारखे जीवांना ही दुःख होते. ।।२८०।।

**पडे बोहो मार अनेकुं ठोड़ ।। तमे युं ब्रम्ह पडे बोहो झोड़ ।।२८१।।**

या जीवावर अनेक जागेवर खुप मार पड्तो.तुम्ही पण असे आहेत तर ब्रम्ह,परंतु ब्रम्ह पासून वेगळे झाल्या कारणाने ही तुमच्यावर झोड पड्ते.(जसे धातुच्या खाणीपासुन वेगळे झाल्याने त्याच्यावर मार पड्ते,तसेच.) ।।२८१।।

**बिछुंटी घात तजी तब खाण ।। माया सो माय भिडयो तब आण ।।२८२।।**

जेंव्हा धातु खाण सोडून खाणीपासून वेगळा झाला तसेच हा जीव ब्रम्हमधून मायेच्या सोबत येऊन भिडला.देहाचा संग पकडून मायेचे सुख भोगण्याची इच्छा करु लागला. ।।२८२।।

**तमे युँ ब्रम्ह कहावो राम ।। धऱ्यो मन रूप तज्यो निजधाम ।।२८३।।**

तुम्ही पण असे जीव आहात.जे ब्रम्ह आणि राम म्हणतात.परंतु निजधाम(ब्रम्ह)सोडून मनाचे रुप धारण केले आहे. ।।२८३।।

**रूप सो खाण कहा नर होय ।। तहाँ सुख जान रहे ओ होय ।।२८४।।**

हे वेगवेगळे रुप(मनुष्य)आणि खाण(ब्रम्ह)तेथे(ब्रम्हमध्ये)हा जीव समजत होता.मी मायेचे पाच तत्वाचा देह धारण करेल तर मला सुख होईल असे समजून मायेचे रुप धारण करुन आला. ।।२८४।।

**अबे धर रूप पडयो बस आय ।। जां त्यां रूप संडासी कवाय ।।२८५।।**

आता या मायेचे पाच तत्वांचे रुप धारण करुन या मायेच्या(पाच तत्वाचा)जाळ्यात पडून गेला. तेथे हे रुप सांडसीमध्ये(कर्मांमध्ये)पकड्ला जात आहे.।।२८५।।

**सहे दुख सीस पि लाजे आण ।। पडे दुःख घात बिछुटे खाण ।।२८६।।**

आता हा येथे दुःख सहन करीत आहे.कर्मांच्या प्रमाणे पेर(पिळला)जातो आहे.(जसे घाण्या मध्ये पिळून तेल किंवा रस काढला जातो तसेच)जसे खाणीतून धातुचे वेगळे झाल्याने त्या धातुवर दुःख पड्त असते. ।।२८६।।

**पलटया नाँव धऱ्या नर नार ।। घडाया कांकण पायल पार ।।२८७।।**

त्या धातुचे नाव बदलून वेगवेगळे नाव ठेवले जाते.जसे धातुचे बांगड्या,पैंजण इत्यादी दागिने बनवून एकाच धातुचे वेगवेगळे नाव ठेवले जातात. ।।२८७।।

**धरी बोहो जात छतीसुं आय ।। अभे अंग दोय ज्यां तां कवाय ।।२८८।।**

असेच मनुष्यांच्या खुप प्रकारच्या जाती छत्तीस प्रकारच्या वेगवेगळ्या(दागिन्यां सारख्या)

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

राम मनुष्यांच्या ही जाती बनवल्या गेल्या.आता येथे तेथे दोन अंग धातु आणि धातुच्या बनलेल्या वस्तु असे दोन अंग होऊन गेले.(होवून) ।।२८८।। राम

राम **अेको मूल आद अनादु होय ।। अबे भर्म नाँव कहावे दोय ।।२८९।।** राम

राम आदि–आनादि मूळ तर एकच होते.परंतु भ्रमाने दूसरे वेगवेगळे नाव होऊन गेले. ।।२८९।। राम

राम **एसे तुं ब्रम्ह बिचारो अेक ।। नारी नर जीव सबे युँ पेक ।।२९०।।** राम

राम असा तुम्ही पण विचार करुन बघा की,तुम्ही आणि ब्रम्ह तर एकच आहे.हे सर्व स्त्री–पुरुष जितेके जीव आहे.ते सर्व आदि एक ब्रम्हच होते.असे बघा. ।।२९०।। राम

राम **धन्यो तत्त रूप बणायो तोल ।। हे सत्त अज पडयो अब मोल ।।२९१।।** राम

राम जसे खाणीतून धातु बाहेर काढल्यावर त्याचे वजन करतात.तसेच या जीवाचे ही ब्रम्हापासून वेगळे झाल्यावर वजन करतात.हा तर होता सत(अविनाशी)अज(आदिचा ब्रम्ह)परंतु याचीच आता किंमत व्हायला लागली आणि खपु(विकु)लागला. ।।२९१।। राम

राम **जळे मल मेल सिहावे काट ।। तबे फिर भाँज घडावे घाट ।।२९२।।** राम

राम आता ही जशी खाणीतून काढलेली धातु जाळली जाते.धातुला मळ,मैल बसुन(मळकट होणे)आणि धातुला गंज लागून,तो गंज त्याला खाऊन जातो.(तसेच ब्रम्हपासून वेगळे झालेल्या जीवांना ही कर्म आदि धातुला लागलेल्या गंजासारखे नाश करतात.जेव्हा धातुला मळ गंज इत्यादी लागतो तेव्हा त्याला पुन: घडवून त्याचा दुसरा घाट(दुसरे रुप)घडवून तयार करतात.तसेच जीवांचेही कर्मांच्या प्रमाणाने दुसरे रुप(त्रियक,देव योनी,लक्ष चौऱ्याशी,भूत,पितर इत्यादी रुप)बदलते. ।।२९२।। राम

राम **तमे सत्त ब्रम्ह नहिं कोई ओर ।। कहाया जीव बण्या बोहो ठोर ।।२९३।।** राम

राम अरे,तुम्ही तर सत ब्रम्ह आहात.तुम्ही ब्रम्ह शिवाय दुसरे कोणी नाही.परंतु आता जीव म्हणवले गेले आणि खुप जागेवर वेगवेगळे बनून गेले. ।।२९३।। राम

राम **जहाँ थी खाण अमोलक तूट ।। पछे बोहो जाग गयो ध्रब फूट ।।२९४।।** राम

राम जेथे धातुची खाण होती ती खाण अमोलक(अनमोल)आहे.परंतु त्या खाणीत धातु वेगळी झाली तेव्हा तेथे द्रव्य खुप जागी फुटून तुकडे–तुकडे वेगळे होऊन गेले.(असेच ब्रम्हपासून जीव वेग–वेगळे झाले.)।।२९४।। राम

राम **तोलो सो पाव रत्ती कछु सेर ।। हे ब्रम्ह सब पराक्रम फेर ।।२९५।।** राम

राम आता धातुच्या खाणीचे वजन कोणालाही करता येत नाही.परंतु धातुचा तोळा,पाव, रत्ती(पाव गुंज)आणि जास्त आहे.तर ते काही सेर(शेर)असे होवू व्हायला लागले. (तसेच ब्रम्हपासून वेगळे झालेले जीव छोट्या वस्तुंचा जसे रत्तीभरचे ही वजन होवून जाते.तसेच जीवांचे ही समजा.धातुचा तुकडा काही शेरचा असतो.तसेच मोठी माणस राम

(मोठे मनुष्य) त्यांचे वजन धातुच्या मोठ्या तुकड्यासारखे जास्त होते.(असते)जसे धातु आहे खाणीचा धातुच परंतु खाणीतून वेगळा झाल्यामुळे छोटे-मोठे वजनाचा फरक पडून गेला.तसे ब्रम्हपासून वेगळे जीवांचे ही पराक्रमात फरक पडून गेला.(जसे मुंगी आणि हात्ती आहेत तर दोघे ही जीवच परंतु पराक्रमाचे अंतर आहे.)।।२९५।।

**तुमे सत ब्रम्ह जां दूजो नी कोय ।। जेती अंस जोत उजाळो होय ।।२९६।।**

तुम्ही सत(अविनाशी)ब्रम्ह तेथे(ब्रम्हमध्ये)कोणी दुसरे नव्हते.जितका अंश असतो. तितकाच जास्त पडतो. ।।२९६।।

**ससि गुण तेज प्रकाशो आण ।। दियो जुग हीर अनंता जाण ।।२९७।।**

जसे चंद्रमाचा गुण चंद्रमाची कला जितकी जास्त राहील तितकाच त्याचा गुण जास्त प्रकाश पडेल.पूर्णचंद्र पूर्ण झाल्यावर चंद्रमणीपासून जगाला चंद्रमा अनंत हिरे देत असतो. (तोच चंद्रमा त्याच्यात काही कमतरता राहील्याने चंद्रमणीपासून हिरे होवू शकत नाही.) ।।२९७।।

**कहिजे तेज पराक्रम सोय ।। उजाळो फेर सुणो सब लोय ।।२९८।।**

तो जसा-जसा तेज होईल.तसा-तसा त्याचा पराक्रम सांगितला जाईल.जसे-जसे अधिक तेज होईल तसा-तसा प्रकाश जास्त होतो.हे सर्व लोक ऐका. ।।२९८।।

**यूँ सब जीव बण्या हे आय ।। कहुँ मै आदर अंत सुणाय ।।२९९।।**

असे हे ब्रम्हपासून येऊन सर्व जीव कमी जास्त बनलेले आहे.आदि आणि शेवट पर्यंत (अंतपर्यंत)ची गोष्ट मी तुम्हाला सांगत आहे. ।।२९९।।

**बिना जल जीव प्रकास्यो नाहि ।। याहाँ घट घाट अगर मांय ।।३००।।**

पाण्या शिवाय हा जीव प्रगट होत नाही. येथे वेगवेगळे घट आणि घाट आगीत ताव देऊन घाट घडवून घट तयार करतात. ।।३००।।

**सुणो द्रब खाण कहि समझाय ।। तमे ब्रम्ह जीव बण्यो यूँ आय ।।३०१।।**

सर्वजण ऐका,मी तुम्हाला धातुची खाण समजवून सांगितली.तसेच तुम्ही पण ब्रम्ह पासून येऊन जीव बनून गेले. ।।३०१।।

**मिले घर मांय मिटावे चूंप ।। तबे सब जाय सुखो दुख रूप ।।३०२।।**

जेंव्हा धातु जमिनीत घसून-घसून किंवा गळून मिळून जाईल.तेंव्हा त्याचा काहीही धातुपणा राहणार नाही.जेव्हा धातु जमिनीत मिळून जाईल तेव्हा त्या धातुचे सुख आणि दुःख सर्व जातील(जेंव्हा धातुचे रुप मिटून जाईल तेव्हा धातुचे सर्व सुख आणि दुःख सुटून जातील.) ।।३०२।।

**सहे बोहो ताव धंवे दिन रेण ।। बणावो नाहिं भळे कुण केण ।।३०३।।**

जोपर्यंत धातु जमिनीत मिळणार नाही. तोपर्यंत धातुला सर्व ताव (ताप) सहन करावे

लागतील.आणि धातुला आगीत टाकून भात्याने रात्र काय आणि दिवस काय भात्याने फुंकून आगीत तापवले जाईल.या धातुचे काही करु नका असे कोण म्हणेल(त्या धातुचे काही करु नका असे म्हणणारा कोणी नाही.)।।३०३।।

**इसी बिध आप मिटावो रूप ।। भळे सुख दुख मिटावो चूप ।।३०४।।**

तुम्हीही या तऱ्हेने आपले रुप मिटवून टाका.तुम्ही पुन: आपले मायेचे सुख–दु:ख मिटवून द्या.म्हणजे तुम्ही मायेचा संग सोडून द्या.मग तुमचा जीवपना जाईल.।।३०४।।

**अडे सो सेंग सहे सिर मार ।। बिना तुम कोण घडावण हार ।।३०५।।**


हे सर्व जीवब्रम्ह असूनही आपसात अडतात आणि एक दुसऱ्यांची मार शिरावर सहन करतात.तुमच्या शिवाय दुसरा घडवणहार(घडविणारा)कोण आहे? ।।३०५।।

**सिरे तल अेरण ऊपर मेल ।। संडासी साय हुवे घण पेल ।।३०६।।**

लोखंडाच्या खाणीतून आलेला लोखंडाचा ऐरण,लोखंडाचा घन आणि लोखंडाची सांडशी हे आपल्याच खाणीतून आलेल्या लोखंडाला त्या लोखंडाची सांडशी,घनाने मारतात. जसे लोखंडाच्या खाणीतून निघालेला ऐरण,घन आणि सांडशी त्या लोखंडाच्या खाणीतून निघालेल्या लोखंडाला मारतात.तसेच हे सर्व जीव ब्रम्हमधून आलेले असून ही एक–दुसऱ्यास मारतात. ।।३०६।।

**कुटिजे आपस माहि बिचार ।। युँ जुग जीव दुखि संसार ।।३०७।।**

जसे लोखंडाला घन,ऐरण आणि सांडशी आपल्याच खाणीतून आलेल्याला कुटतात.




तसेच होनकाळ पारब्रम्हपासून निघालेले जीव काही घनासारखे बनतात.काही ऐरण सारखे बनतात.तसेच काही सांडशी सारखे बनतात आणि ते दुसऱ्या जीवांना कुटतात म्हणजे दु:ख देतात. याप्रकारे संसारात जीव दु:खी आहेत. ।।३०७।।

**पडे सो मार अनंता केर ।। खरे कू ताव न देवे फेर ।।३०८।।**

अशी त्या जीवावर अनंत मार पडत आहे.परंतु लोक खरे(असली)लोखंडाला(पोलादला) कोणी पुन: ताव(ताप)देत नाही. ।।३०८।।

**बहे अंग अेक सबे बन माय ।। लुळे मुंडे नाहि खिरे तब जाय ।।३०९।।**

सर्व वनात सर्व झाडांवर सर्व अवजार एकाच स्वभावाने एकाच अंगाने चालतात.परंतु जो पक्या पोलादचा आहे तो लपकत ही नाही आणि मुडतही नाही आणि बसतही नाही.परंतु त्यातुन एखाद वेळेस काही भाग तुटून पडतो.तो मातीत मिळून जातो.त्या तुटलेल्या मातीत मिळालेल्या भागावर कधी ही ताव पडत नाही. ।।३०९।।

**इसो अंग अेक संभावो जाण ।। भजो निजब्रम्ह मिलो सत्त खाण ।।३१०।।**

तर त्या तऱ्हेचा(प्रकारचा) पक्का पोलादी सारखा एक स्वभाव धारण करा.(पक्के रहा)

त्या निज ब्रम्हचे भजन करुन,आपल्या निजखाणीत न मिळता सतखाणीत मिळून जा.(आपली खाण म्हणजे ज्या खाणीतुन धातु आला,ती आपली निजखाण)आणि सतखाण म्हणजे ही सर्व पृथ्वीची ज्या पृथ्वीवर सर्व धातुंची खाण आहे.अशी ही सर्व पृथ्वी या सत खाणीत म्हणजे पृथ्वीमध्ये घासून-घासून मिळून गेला.त्या पृथ्वीत मिळालेल्या धातुच्या वर पुनः पुनः मार पडत नाही.परंतु जो आपल्या खाणीत(धातुच्या खाणीत) मिळाला तर तो धातु पुन्हा पुन्हा खाणीतून काढला जातो आणि खाणीतून काढून आणला की आणखी पुन्हा त्याच्यावर ताव व मार पडते.धातुचा भाग(अंश)सतखाण म्हणजे खाणीची खाण पृथ्वी या पृथ्वीला मिळालेल्या धातुच्या वर परत ताव व मार पडत नाही.या तऱ्हेने ब्रम्हमधून आलेले जीव,पुन्हा ब्रम्हमध्ये जाऊन मिळून गेले तरी ही जसे खाणीत मिळालेली धातु परत खाणीतून निघाल्यावर त्याच्यावर ताव व मार पडते या तऱ्हेने पुन्हा ब्रम्हमधून आल्यावर त्याच्यावर संचित कर्मांचा मार व ताव पडायला लागतो.याकरीता ब्रम्हमध्ये न मिळता ब्रम्हचे उल्लघंन करुन ब्रम्हच्या पलिकडे जाण्याचा विचार करा.जसे खाणी शिवाय पृथ्वीमध्ये धातु मिळून जातो तसे.।।३१०।।

**युँहि सब बणायो घाट ।। मिले सब रेत परोटे जाट ।।३११।।**

असेच सर्व घाट बनविले.ते घाट मातीत मिळून गेल्यावर जसे शेतकरी शेतीची मशागत इत्यादी कार्य,फावडा,कुदळ,हंसुआ इत्यादी अवजारांनी मिळुन जातात.जो भाग जमिनीत मिळून गेला त्याच्यावर परत ताव आणि मार पडत नाही. ।।३११।।

**नहिं सो चूप सरावे आण ।। घसे घस सेग मिले धर जाण ।।३१२।।**

नंतर त्याच्यात कोणतीही चुक राहत नाही आणि त्याची येऊन शोभा पण करीत नाही. घसून-घसून सर्व(लोखंड)जेव्हा जमिनीत मिळून जाईल. ।।३१२।।

**जाहाँ सुं होय मिल्यो तां मांय ।। अबे घण घावन लागे आय ।।३१३।।**

जेथून उत्पन्न झाले तसेच त्याच्यात जाऊन मिळा.आता त्याच्यावर घनाचे घाव येऊन लागणार नाही.(कारण की आकार मिटून धातु जमिनीत मिळून गेला)त्याच्यावर घनाचा घाव लागू शकत नाही. ।।३१३।।

**संडासी घण अेर नर आग ।। हमे बस नाथ मिले धुर जाग ।।३१४।।**

आता हा धातु सांडशी,ऐरण,धन आणि आग यांच्या वश राहीला नाही.कारण तो धातु आपली खाणची खाण पृथ्वीमध्ये जाऊन मिळून गेली.धातु खाणीमध्ये जाऊन मिळाली असती तर दुसऱ्यांदा(परत)येऊन जाते,परंतु धातु आधीच्या जागी म्हणजे ज्या जागे-पासून(पृथ्वीपासून)खाण निघाली त्या पृथ्वीतच जाऊन मिळून गेली. ।।३१४।।

**सबे गहे राछ अनेक संभाय ।। अबे बस नहिं मिल्या धर माय ।।३१५।।**

आता सर्व अवजारातून ती जमिनीत मिळालेली धातु पकडली जात नाही.जो धातु जमिनीत

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

मिळून गेला.आता कोणाच्या वश राहीला नाही. ।।३१५।।

**तहाँ लग होयर जोखंड लार ।। जहाँ लग घाट दिरावे मार ।।३१६।।**

जमिनीत मिळता मिळता जर त्याच्यातील नंतर थोडासा तुकडाही राहून गेला तरीही त्याच्यावर परत जोपर्यंत घाट आहे तोपर्यंत वरतून मार देतीलच.(खुपसा भाग जमिनीत मिळून गेला आणि नंतर थोडासाही भाग जर राहून गेला तरीही त्याच्यावर जोपर्यंत घाट आहे तोपर्यंत त्याच्यावर मार देतीलच.।।३१६।।

**मिटावे सेंग धऱ्यो आकार ।। तबे घण घावण लागे हे मार ।।३१७।।**

जो आकार धारण केला आहे ते सर्व आकार मिटवून द्याल.तेव्हा आकार मिटून गेल्यावर घनाचा घाव आणि मार लागणार नाही. ।।३१७।।

**इसी बिध आप बिचारो आय ।। मिले ज्युँ धात मिलो तुम जाय ।।३१८।।**

या तऱ्हेने करण्याचा आपण ही मनात विचार करा.जसे धातु जमिनीत मातीत मिळून जातो.तसेच तुम्हीही जाऊन मिळा.(तुमचा जीवपना मिटून द्या)जीवाला म्हणजे ब्रम्हची छाया झाडाची छाया(सावली)कशी मिटते,म्हणाल तर सूर्याच्या वरती सरळ आल्यावर, खांबाची छाया(सावली)मिटून जाते.तसेच रसनेशी लीव लावून सुरत व शब्द बंकनाळच्या रस्त्याने वरती चढतो.तो शब्द वर सहस्त्रदल कमळामध्ये आल्यावर जीवपना मिटायला लागतो.तो शब्द ठीक ब्रम्हांड्मध्ये आल्यावर जीवपना मिटून जातो.(याकरीता सतगुरु सुखरामजी महाराज जो निर्णय केला आहे.तो अबधूच्या संवादात श्लोक ९१ मध्ये ३१४ त बघा.)।।३१८।।

**छुडावो दाग अजल ओलाद ।। मिटावो सेंग किया सुख स्वाद ।।३१९।।**

तुम्ही तुमचे डाग(कर्म)सोडून द्या.अजल(पुत्र,नाती,पणती)(मुलबाळ)जे तुम्ही सुख आणि स्वाद केले ते सर्व मिटवून द्या. ।।३१९।।

**रहे सो लार तिका बिध कोय ।। ताहाँ लग पार न पूंचे सोय ।।३२०।।**

जे काही मागे राहते तर त्याची विधी आहे की,तो पर्यंत मागे राहीलेला भाग पार पोहचत नाही. ।।३२०।।

**भुगतो सेंग किया सो आय ।। अबे सो गल मे बंधोस जाय ।।३२१।।**

जे जे येऊन कर्म केले असतील ते सर्व केले गेलेले कर्म भोगा.जे जे कर्म आता केले ते सर्व गळ्यात बांधले गेले. ।।३२१।।

**मिले सो सेंग सुखो दुख आय ।। तजो सब सुभ असुभ उपाय ।।३२२।।**

जसे–जसे कर्म केले ते सर्व तसे–तसे सुख व दु:ख येऊन मिळतात.आता तुम्ही शुभ व अशुभ सर्व उपाय सोडून द्या.।।३२२।।

**मिलो घर आद अनादु जाय ।। तबे तुं ब्रम्ह न दूजो कवाय ।।३२३।।**

आता तुम्ही आदि घरी(ब्रम्ह)याच्याही पलिकडे आदी घरी जाऊन मिळा.तेंव्हा तुम्ही ब्रम्हच आहात दुसरे कोणी नाही. ।।३२३।।

**कहुँ सत्त बात सुणाऊं तोय ।। मिलो घर आद सबे कल खोय ।।३२४।।**

मी खरी गोष्ट तुला सांगत आहे.सर्व कल सोडून आदि घरी जाऊन मिळून जा.।।३२४।।

**तुमे हम ब्रम्ह बिस्वा बीस ।। चलो घर आद कहावो ईस ।।३२५।।**

तुम्ही आणि मी बीस–बीसवे(१०० प्रतिशत)ब्रम्ह आहे.तर आता आपल्या आदीघरी चला. मग आम्ही ही आपल्याला(तुम्हाला)ईश्वर म्हणवू.जसे मायेत ब्रम्हा,विष्णू,महेश ईश्वर म्हणवतात तसे आम्ही पण सतस्वरुपात ईश्वर म्हणवू.।।३२५।।

सिष वायक दोहा ।।

**हम तुम से ऐसी कहुँ ।। सुणो हेत चित लाय ।।**
**काहाँ घर आद अनाद हे ।। सो घर कोण कहाय ।।३२६।।**

शिष्य बोलला की,मी तुम्हाला असे सांगतो की,त्याला तुम्ही प्रिती व चित्त लाऊन ऐका.ते घर आदी घर कोणते आहे?आणि अनादी घर कोणते आहे?ते असे अनादी घर कोणते सांगतात?ते सांगा. ।।३२६।।

**कहाँ सुं चल मै आवियो ।। कह सुणावो मोय ।।**
**मै जाणुं इण बाहरी ।। अवर न जगा होय ।।३२७।।**

मी येथे(संसारात)खेळत आहे.ते मला बोलून सांगा?मी जाणतो की याच्या शिवाय दुसरी कोणतीही जागा नाही. ।।३२७।।

**वाहि सो मै रम रहयो ।। ओ घर आदर अंत ।।**
**मै नहिं जाणु ओर कूं ।। काहाँ बिराजे संत ।।३२८।।**

तेथून येऊन मी संसारात खेळत आहे.ते घर आदी आणि अंत आहे.दुसरे मी काही जाणत नाही.हे सर्व संत कोठे जाऊन विराजमान होतात हे मला काहीही माहीत नाही. ।।३२८।।

**सिध साधक मूनि जना ।। सुर नर देव कहाय ।।**
**सो सब धर पर रम रया ।। सतलोक कुण जाय ।।३२९।।**

सिध्द साधक,मुनी आणि जन म्हणजे संत,सुर म्हणजे देव,नर म्हणजे मनुष्य,देव म्हणजे ब्रम्हा,विष्णू,महादेव हे सर्व म्हणवतात.हे सर्व या जमिनीवरच खेळत आहे.ते सर्व तर जमिनीवर येथे फिरत आहे.तर त्या सतलोकात कोण जाते ?।।३२९।।

**सतलोक जहाँ कुण बसे ।। काहाँ कहो उण जाग ।।**
**को बाणी क्या रंग हे ।। को बेली क्या राग ।।३३०।।**

आणि तुम्ही म्हणता तर त्या सतलोकात कोण निवास करतो? आणि त्या सतलोकात

काय आहे?ते सांगा?आणि तेथिल रंग काय आहे?तेथे बेला म्हणजे वेळ कोणती आहे? आणि प्रिती कोणाशी आहे? ।।३३०।।

**कोवो धाम बिचार के ।। बरणो बिध बमेक ।।**
**सतलोक क्या सुख हे ।। मिल क्या जाणे पेख ।।३३१।।**

तो धाम विचार करुन सांगा?त्या धामाची विधी आणि विवेक वर्णन करुन सांगा?त्या सतलोकात काय सुख आहे?आणि तो धाम मिळाल्यावर पाहिल्यावर काय जाणले जाते? ।।३३१।।

**मिले किसी बिध जाय के ।। सो सब कहो उपाय ।।**
**तीन लोक तासुं परे ।। ताहाँ किसी बिध जाय ।।३३२।।**

आणि तेथे कोणत्या विधीने जाऊन मिळता येते?तेथे जाऊन मिळण्याचे सर्व उपाय मला सांगा?हा सत्तधाम तीन लोकांच्या पलिकडे आहे.तेथे कोणत्या विधीने जाता येते?।।३३२।।

**सुरग मध पाताळ ले ।। तीनु धाम कहाय ।।**
**ताहाँ आगे को बात सुण ।। मिल कर कहे न आय ।।३३३।।**

स्वर्गलोक,मृत्युलोक,पाताळलोक असे तीन लोक म्हणवितात(म्हटले जातात)यांच्या पुढची गोष्ट ऐकून तो धाम मिळाल्यावर तेथून कोणी येऊन सांगत नाही. ।।३३३।।

**तीन धाम बिसराम हे ।। ते जाणे सब कोय ।।**
**के बिरिया उत जाय बो ।। बोहो बिरिया तत्त होय ।।३३४।।**

हे तीन धाम जीवांना विश्राम करण्याचे आहेत म्हणजे राहण्याचे आहेत.या तिन्ही लोकांना सर्व ही जाणतात.किती वेळ तेथे जाण्यास लागेल आणि कोणत्या वेळेपर्यंत तत्त(ब्रम्ह)म्हणजे माया रहीत होईल?।।३३४।।

**जाणे कदे न देखिया ।। काना सुण्या न भेव ।।**
**कहे संत चोथा देस में ।। हम हिं मिले केसा देव ।।३३५।।**

मी जाणले नाही आणि डोळ्यांनी पाहिले नाही आणि कानाने कधी त्याचा भेद ऐकला नाही चौथ्या देशात संत सांगतात तो देश आम्हाला कसा मिळेल ? ।।३३५।।

गुरू वायक ।। छंद ।। मोती दान ।।

**रटो राम नाम तुमि ब्रम्ह होई ।। बिना तुम देव नहिं देख्यो कोई ।।३३६।।**

रामनामाचे रटन करा.ज्यामुळे तुम्ही ही ब्रम्ह होऊन जाल.तुमच्या शिवाय दुसरा देव बघितला ही नाही. ।।३३६।।

**जाहाँ सतलोक तमे ताहाँ पूर ।। नहि रंग रूप अरूप हजूर ।।३३७।।**

जेथे सतलोक आहे,तेथे तुम्ही भरपूर आहात. तेथे मायेचा रंग नाही, रुप नाही,अरुपी

असून हजर आहे.।।३३७।।

**इयाँ खिण खेव नाँहि सतदेव ।। अभे अंग दोय तिहुँ लोक होय ।।३३८।।**

जेथे जगातील सर्व स्त्री–पुरुषांपासून ब्रम्हा,विष्णू,महादेव देवता पर्यंत नाश होणारे देव आहेत.येथे कोणीही सतदेव नाही.ब्रम्ह आणि माया असे दोन अंग तिन्ही लोकात असतात. ।।३३८।।

**बिना सत ग्यान पड्यो भ्रम बीच ।। माहो मांय दुखी माया अंग कीच ।।३३९।।**

सर्व जीव सतज्ञाना शिवाय भ्रमात पड्ले आहेत.सर्व आपल्या–आपल्यात दु:खी होतात. माया रुपी गारा सर्वांच्या अंगाला लागला आहे. ।।३३९।।

**जाहाँ सतलोक मिटो अंग सार ।। आपो आप ब्रम्ह रहो निरधार ।।३४०।।**

जेथे सतलोक आहे.तेथे जाऊन सर्व स्वभाव मिटवून द्या.तेथे स्वत:च ब्रम्ह होऊन निर्धार म्हणजे आधारा शिवाय रहा. ।।३४०।।

**नहिं सुख चेन न को दुख दाई ।। तुमि ब्रम्ह आप बिना कुल माई ।।३४१।।**

तेथे मायेचे कोणते ही सुख चैन नाही आहे आणि तेथे काळाचे दु:ख देणारे ही कोणीही नाही.तुम्ही स्वयं कुळा शिवाय व माता–पिता शिवाय असा ब्रम्ह आहात. ।।३४१।।

**जाहाँ सतधाम न माले हे कोय ।। सदा थिर थंभ अभंग स होय ।।३४२।।**

जेथे सतधाम आहे.तेथे ५ विषयांचे भोग ही नाही.तो सतलोक सदा स्थिर थंभ म्हणजे नेहमी राहणारा,अभंग म्हणजे भंग न होणारा असा आहे. ।।३४२।।

**अपार अग्याद अजीत अनाथ । ताहाँ सतलोक ना कोई मान न साथ ।।३४३।।**

अपार म्हणजे ज्याचा पार नाही,अगाध,अजीत,म्हणजे कोणाकडून जिंकल्या जात नाही असा,अनाथ तो सतलोक आहे.तेथील साथी ही नाही व मान ही नाही. ।।३४३।।

**अलाय अलोप अतूट असाल ।। जाहाँ ब्रम्ह धाम नहिं मंझ पाल ।।३४४।।**

तो अलाय,अलोप,अटूट,असल जेथे ब्रम्ह धाम आहे.तेथे मध्ये अटकाव नाही. ।३४४।।

**हुवा न मुवा न किया न कोय ।। इसा अदभुत लखाया मोय ।।३४५।।**

तेथे कोणी उत्पन्न झाला नाही आणि मेला ही नाही आणि कोणी कोणाला घडविले ही नाही.असा अद्भूत माझ्या समज मध्ये आला. ।।३४५।।

**अमोल अलेख अचाय न चाय ।। बण्या बिध मोख बिराजे हे राय ।।३४६।।**

तेथे प्रत्येक जीव अमोल आहे,अलेख आहे.मायेची चाहना नसलेला आहे.असा हंसा करीता तो मोक्षपद बनला आहे.तेथे विराजणारे सर्व राजा आहे. ।।३४६।।

**अरेह अराह अरोसन रीस ।। नहि कोई रिझ न को वेखीस ।।३४७।।**

अरेह (राहत नाही) अराह(रस्ता नाही)अरीस आणि रीस ही नाही.कोणी कोणावर खुश झाला ही नाही आणि कोणी कोणाच्यावर खीस म्हणजे खिझत (रागवतही) ही नाही.

।।३४७।।

**अथाह अचुक न बार न पार ।। बिना थंभ धाम बण्या निरधार ।।३४८।।**

अथाह म्हणजे थाह नाही,अचूक म्हणजे बिनचूक त्याचा वार-पार ही नाही.त्याला खांब ही नाही लावले आहे.तो बिना खांबाचा निराधार बनलेला धाम आहे. ।।३४८।।

**जाहाँ सुख चेन अचेन न कोय ।। न को त्रण जो बन बुढा न होय ।।३४९।।**

तेथे काही सुख-चैन ही नाही आणि येथल्या सारखे काळाचे दु:ख ही नाही आणि येथील देहा सारखा कोणी तरुण ही नाही.जवान ही नाही आणि कोणी म्हातारा ही होत नाही. ।।३४९।।

**अखिह अचाल अलोप अलंग ।। जाहाँ सतलोक नहिं लिंग भग ।।३५०।।**

अखीह म्हणजे फुटलेला,अचाल म्हणजे न चालणारा अलोप म्हणजे गुप्त न होणारा, अलंग म्हणजे ज्याला कोणी लांघु शकत नाही असा सतलोक आहे.तेथे लींग ही नाही आणि भग ही नाही. ।।३५०।।

**बिना जळ देव दयाल दिखाय ।। रमे सब जीव माया मंझ माय ।।३५१।।**

तेथे पाण्या शिवाय आणि देवा शिवाय तो दयाळ दिसण्यात येतो.येथे सर्व जीव मायेत रमत असतात. ।।३५१।।

**न जाणुं हुँ राम तुमारा पार ।। काहाँ ऊं देस नहि नर नार ।।३५२।।**

रामजी तुम्ही अपार आहात.तुमचा पार मला समजत नाही(माझ्या समजमध्ये येत नाही)तो देश कोणता आहे?की जेथे स्त्री ही नाही व पुरुषही नाही.(जेथे लींग ही नाही व भग ही नाही)।।३५२।।

**जमी पे रहाय अधार न बिन ।। कहाँ सतलोक कहो सब धिन ।।३५३।।**

जमिनी शिवाय,आधारा शिवाय ज्याला सर्व धन्य म्हणतात तो सतलोक कोठे आहे? ।।३५३।।

**गिर मेर पहाड़ बड़ा भुज काहाँ ।। ताहाँ सतलोक कहे हेक नाहा ।।३५४।।**

गिरी(मोठा पहाड)मेर(पर्वत)पहाड भुज(          )म्हणवितात त्या सतलोकात हे आहे किंवा नाही. ।।३५४।।

**अभे आ कास ताहाँ का होय ।। कहो मद बिच बतावो मोय ।।३५५।।**

आता आकाश तेथे कोठे असते सांगा?तो सतलोक कोणाच्या मध्ये आहे ते मला सांगा? ।।३५५।।

**कहुँ बिध ठोड़ केतियक तोय ।। बूंजुसत्त लोक बतावो मोय ।।३५६।।**


याची विधी आणि जागा तुला सांगतो.मी विचारतो आहे,सतलोक मला सांगा?।।३५६।।

दोहा ।।

जन सुखदेव निजमन कहे ।। सुण अपमन सत्त बात ।।
सतलोक सब मांय हे ।। सोझो देह पिंड गात ।।३५७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले निजमन सांगते ती गोष्ट ऐका.सतलोक सर्वांमध्ये आहे.जर सतलोक बघायचा असेल तर आपला देह पिंड(शरीर)आणि गात(अवयव)हे सर्व शोधा. ।।३५७।।

तीन लोक चवदा भवन ।। ऊँच नीच सब लार ।।
सतलोक मे रम रहया ।। जाणे नहिं बिचार ।।३५८।।




तीन लोक व चौदा भवन उच व निच या सर्वांच्या मागे(सोबत)हे सर्व सतलोकात रमन करुन राहीले आहे.परंतु याचा विचार,भेद जाणत नाही. ।।३५८।।

सब माहि सतलोक हे ।। बैठा सब उन मांय ।।
माया मोह सुं लपटिया ।। तां ते दरसत नाय ।।३५९।।

हा सतलोक सर्वांमध्ये आहे आणि सर्व त्या लोकात बसले आहे.परंतु माया आणि मोहात जीव लपटेले असल्याने तो सतलोक दिसत नाही.(जसे तोंडावर ओढून घेतलेल्या मनुष्याला जवळची वस्तुपण दिसत नाही.तसेच माया मोहाचा पड्दा असल्याने तो सतलोक दिसत नाही.) ।।३५९।।

जन सुखदेव तो सुं कहे ।। निजमन कूं समझाय ।।
सत्त शब्द सतलोक मे ।। उतपत प्रळो नाय ।।३६०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज निजमनाला समजावून सांगतात की,सतलोक आणि सतशब्दा मध्ये उत्पत्ती आणि प्रलय नाही. ।।३६०।।

बाहिर को सतलोक कूं ।। सुणज्यो सब नर आय ।।
पोल मुष्ट में ना बंधे ।। ओहि लोक कहाय ।।३६१।।

बाहेरचा सतलोक मी तुला सांगतो.त्याला सर्व लोक येऊन ऐका.तो पोल(आकाश) मध्ये किंवा मुठठी(मुठ्ठीमध्ये)बांधला जात नाही तो सतलोक आहे. ।।३६१।।

सुण साहेब युँ रम रया ।। घृत दूध रस माय ।।
महा सुन पर सुन हे ।। सो सतधाम कहाय ।।३६२।।

सतस्वरुप शुन्य साहेब सर्वांमध्ये असा रमण करुन राहीला आहे जसे तूप दुधात रमण करुन राहीले आहे.हा सतस्वरुप शुन्य साहेब ज्याला सतधाम म्हणतात.तो होणकाळा सारखा मोठ्या शुन्य साहेबाच्या पलिकडे आहे. ।।३६२।।

सिख वायक ।।

ओ सतलोक सरूप हे ।। तो मुझ सोच न कोय ।।

हालुं डोलुं फिर घीरूं ।। रहुँ इसी मे सोय ।।३६३।।

हे सतलोकाचे स्वरुप आहे तर मला कोणतीही फिकीर नाही.याच्यातच मी चालतो, हिरतो,फिरतो आहे आणि याच्यातच झोपलेला राहतो. ।।३६३।।

यां मे बौ बाता कहुँ ।। यांहि लील बिलास ।।

तो मो कूं क्या सोच हे ।। मो सत सांई पास ।।३६४।।

आणि याच्यातच खुपश्या गोष्टी सांगतो आणि याच्यातच लीला व विलास करतो.जर सत साँई(स्वामी)माझ्या जवळ आहे.तर मला काळजी कसली आहे. ।।३६४।।

सो सत्त शब्द सरूप हे ।। सतधाम कहुँ लाय ।।

तुम़ को तिण बिध रीत सूं ।। हम बेठा उस माय ।।३६५।।

जो सतशब्द सतस्वरुप आहे त्याचा सतधाम आणून सांगतो.तुम्ही सांगतात त्या रीतीने आणि तुम्ही सांगता त्या विधीने तर मी त्या सतधामात जावून बसलो आहे. ।।३६५।।

आठ पोहोर चोसट घडी ।। रहुँ सत्त सुंन मांय ।।

तम साहिब सत्त अेक हे ।। भजुं कोण पे जाय ।।३६६।।

मी आठोप्रहर रात्र–दिंवस सतशुन्यमध्ये राहतो.आपण सांगता सतसाहेब सर्व जागी एकच आहे.तर आता कोणाचे भजन करु?कोणा जवळ जाऊ? ।।३६६।।

गुरू वायक ।। छंद ।।

सुणो मन देवा ।। कहुँ सुन भेवा ।।

माया सुन क्वाई ।। बसे जुग माई ।।३६७।।

मन देव ऐक,मी तुला शुन्याचा भेद दाखवतो.मायेचे शुन्य म्हणवते,त्याच्यात सारे जग निवास करते. ।।३६७।।

दोहा ।।

तीसुं सुन फिर दोय हे ।। छोटी बीच अनेक ।।

तांहा लग आतम राम हे ।। माया हिल मिल पेक ।।३६८।।

तीन शुन्य आणखी ही दोन छोटे शुन्य त्याच्यामध्ये अनेक आहे.जोपर्यंत मायेशी हिळून –मिळून दिसतो.तोपर्यंत आत्माराम म्हणजे ५ आत्म्यासोबतचे ब्रम्ह आहे. ।।३६८।।

माया सुन अेती कही ।। ताहाँ लग सुर नर होय ।।

सातां मध सब देवतां ।। इक बीस मध सब लोय ।।३६९।।

जेथपर्यंत सुरु(देव),नर(मनुष्य)आहे.तेथपर्यंत मायेचे शुन्य सांगितले(दाखवले)आणि सात ,(भुर,भुवर,स्वर,महर,जन,तप,सत)शुन्यांमध्ये सर्व देव आहे आणि मेरुदंडच्या २१ मण्यांच्या शुन्यांमध्ये वेगवेगळे २१ लोक आहेत. ।।३६९।।

ता मे फेर भिन केहत हे ।। तीन सुन अधिकार ।।

तिण मे मोटा देवतां ।। सो सब हे उण लार ।।३७०।।

त्याच्यात आणखी ही तीन शुन्य वेगळे आहे.त्यांच्या अधिकार जास्त आहे.त्या मोठ्या तीन शुन्यांमध्ये मोठे तीन देवता म्हणजे ब्रम्हा,विष्णू,महादेव राहतात आणि त्यांच्या सोबत त्यांच्या सारखी स्थिती प्राप्त केलेले अनेक देवता आहेत.जसे ब्रम्हाच्या लोकाचे ब्रम्हासारखे,देवता विष्णूच्या लोकाचे विष्णू सारखे देवता,शंकराच्या लोकाचे शंकरा सारखे देवता. ।।३७०।।

**आगे सुन अपार हे ।। नव सुन मोटी जोय ।।**
**महा सुंन पर सुंन सूं ।। आगे साहिब होय ।।३७१।।**

त्याच्या पुढे अपार शुन्य आहेत.त्याच्या पुढे नऊ शुन्य(महामाया,प्रकृती,ज्योती,अजर, आनंद,वजर इखर,सतलोक,जींग)खुप मोठे बघा.मोठ्या शुन्याच्या वरच्या शुन्याच्या पलिकडे साहेब आहे. ।।३७१।।

**माया सुंन सब सोझ के ।। मिलो परम सुन जाय ।।**
**तब तुम साहेब अेकवो ।। सतलोक के मांय ।।३७२।।**

मायेचे सर्व शुन्य शोधून परम शुन्यात जावून मिळा.तेव्हा तुम्ही सतलोकात जाऊन तुम्ही व सत साहेब एक होवून जाल.।।३७२।।

सिष वायक ।।

**ओ तुम भेव बतावियो ।। परम सुन को आय ।।**
**बिन पर पाखाँ बाहिरो ।। क्युँ कर उड वाहाँ जाय ।।३७३।।**

हा परम शून्याचा भेद,आपण मला सांगितला तो पराच्या शिवाय आणि पंखाच्या शिवाय तेथे उडून कोणत्या तऱ्हेने जाईल. ।।३७३।।

**पर पाखाँ मेरे नहीं ।। पावाँ चल्यो न जाय ।।**
**बिचे तुम बोहो सुंन कही ।। क्युँ कर मिलिये आय ।।३७४।।**

मला पर नाही आणि पंखही नाही आणि पायांनी चालत जाता येत नाही आणि मध्ये आपण खुपसे शुन्य सांगितले,तर मग कोणत्या तऱ्हेने जाऊन भेटणे होईल. ।।३७४।।

**सुनं सुन के बीच में ।। पडदा घाट करूर ।।**
**बिन आवध सस्त्र बिना ।। कोहो किम करिये दूर ।।३७५।।**

शुन्या-शुन्यांच्या मध्ये खुपसे पड्दे आणि खुप कठीण घाट आहे.तर हत्यारा शिवाय आणि शस्त्रा शिवाय हे पड्दे आणि घाट किनारे,कसे केले जातील,हे मला सांगा. ।।३७५।।

**प्रथम तो सब भूलग्या ।। नवदा बेद बिचार ।।**
**कित्त सायब सतलोक हे ।। कोहो कुण जाण न हार ।।३७६।।**

प्रथम तर नवविद्याभक्ती मध्ये आणि वेदांचा विचार करण्यात सर्व लोक भुलून गेले.

(विसरुन)कोठे साहेब आहे व कोठे सतलोक आहे?तर यांना(सतलोक व साहेबाला) जाणणारा कोण आहे,ते सांगा. ।।३७६।।

गुरू वायक छंद ।। अर्ध भुजंगी ।।

**कहुँ सत्त भेवा ।। सुणो सब देवा ।। गहो ग्यान भारी ।। लगे मंझ तारी ।।३७७।।**

मी सतभेद सांगतो सर्व देवांनो ऐका.हे भारी ज्ञान धारण करा.त्याच्या मधात टाळी लागेल.।।३७७।।

**हिर दे मुख हेला ।। करे केण पेला । धरो ध्यान सोई । भजो नित्त मोई ।।३७८।।**

सर्व प्रथम ह्रदयातून व मुखाने पुकार करा आणि सर्व ध्यान करा. ।।३७८।।

**नाभी धाम लारा ।। पिया पेम प्यारा ।। उभे अंक दोई । गहो मुख सोई ।।३७९।।**

नाभी धामात मागे,प्रेमाचा प्याला पिवून घेतला.दोन अंक रा व म हे मुखात धारण करा.।।३७९।।

**दिवस रात सारी । लवे जीभ प्यारी । तबे गेल सूझे । बड़ा संग बूझे ।।३८०।।**

रात्र-दिंवस जीभ चालते ती खुप प्रिय वाटते.मोठ्या सतपुरुषांचा संग करुन त्यांना विचाराल,तेव्हा रस्ता समजेल. ।।३८०।।

**रटे नाँव सोई । ब्रेह बिध होई । छाडे मान माया । कसे काम काया ।।३८१।।**

नाम रटण करतो.तेव्हा ही विधी होते,की विरह आता(उदासी येवून,आश्रु येणे)नंतर माया पण सोडून देते आणि मान तर बिलकुल ही चाहत नाही आणि कामाला कसुन, कायेला ही (शरीरालाही)कसु लागतो. ।।३८१।।

**हरे हेत सारा ।। लगे नाँव प्यारा । हिरदा नाभ अेकी । माया सुन पेखी ।।३८२।।**

आणि सर्वांची प्रिती सोडून देतो आणि फक्त नाम प्रिय वाटते.ह्रदय आणि नाभी या दोन जागेवर एकसारखी माया शुन्य बघितली. ।।३८२।।

**पड़्यो ताव सोई । रोवे सब लोई । काहा खेल क्काणो । पाँच धर जाणो ।।३८३।।**

तेथे सर्व शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध या पाची घरांचे पाची लोकांवर कष्ट पडू लागले. याकारणाने सर्व शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध हे पाची रोगी रडू लागले.या पाची लोकांचे रडणे पाहून हा जीव हा काय खेळ आहे हा विचार करतो. ।।३८३।।

**नाभी नास धारा । अेको सूत सारा ।धिनो राम राई । दियो भेव आई ।।३८४।।**

नाभी व नासीका(नाकात)मध्ये एक धार लागून गेली.त्याचे सर्व सुत बांधले गेले.आपण रामजी धन्य आहात की मला येऊन असा भेद दिला. ।।३८४।।

**गरजी गेण सारी ।। पियो पेम भारी । सुणो संत सोई । अबे पंख होई ।।३८५।।**

सर्व गगन गरजायला लागले,त्याचे भारी प्रेम पिण्यात आले.सर्व संत ऐका.तेंव्हा उडण्याचे पंख बनतात.।।३८५।।

मुखाँ बिच झूल्या । कंठ कंवळ फूल्या । धुजे रूम सारा । नखो चख प्यारा ।।३८६।।
आधी मुखात झोके घेऊ लागला.नंतर कंठाचे कमळ फुलले,नंतर सर्व शरीराचे रोम कापायला लागले आणि नखांमध्ये आणि डोळ्यांमध्ये सर्व जागी(शब्द)प्रिय वाटू लागला. ।।३८६।।

छंद मोतीदान ।।

पिया रस पेम चडी मतवाल ।। हिरदे बिच अेक रमे सत्त बाल ।।३८७।।
जेंव्हा प्रेम रस प्यालो,तेंव्हा त्याचा नाश होवून मतवाला होवून गेला.हृदयात एक सत बालक म्हणजे सतशब्द खेळू लागला. ।।३८७।।

करे किळ कोल हसे मुरझाय ।। निसो दिन बाल रमे उर मांय ।।३८८।।
तो बालक किलकोल(ध्वनी)किलकारी करतो कधी हासतो तर कधी कोमेजुन जातो. तो बालक रात्रंदिवस हृदयात खेळायला लागला. ।।३८८।।

उछाला खाय हिरदा उर मांय ।। सबे जुग ख्याल सुवावे नाय ।।३८९।।
हृदयात उछाल खातो,आता संसाराचे सर्व खेळ चांगले वाटत नाही. ।।३८९।।

रमे इण रीत निसो दिन स्याम ।। पडे जळ बाय हिरदे उर धाम ।।३९०।।
याप्रकारे रात्रं-दिवस खेळू लागला.या त-हेने पाणी आणि हवा हृदयाच्या धामात (स्थानात)पडू लागला. ।।३९०।।

चमके जोर अपणा आप ।। धुजे सब रोम कांपे सब पाप ।।३९१।।
आणि तुम्ही तुमच्याच जोराने चमकु लागले आणि शरीराचे सारे केस कापायला लागले आणि आतील सर्व पाप कापायला लागले. ।।३९१।।

उठे मंझ लेहर समदा छोल ।। पड़े घर गाँव अचूकी रोल ।।३९२।।
आणि हृदयात लहर,समुद्राच्या लहरा सारखी उठायला लागली.ती जशी घर व गावात अचूक धूम व्हायला लागली. ।।३९२।।

उबके आय कुवे जळ नीर ।। झरे नित नेण लग्या अंग तीर ।।३९३।।
जसे विहिरीतून पाणी डबकायला लागते.विहीरीच्या वरुन पाणी उसळू लागते.याप्रकारे डोळ्यातून नेहमी पाणी वाहते आहे.कारण की हृदयात ज्ञानाचा तीर लागला.(याप्रकारे विरह येऊन डोळ्यातुन उसळलेल्या पाण्यासारखे पाणी वाहते.)।।३९३।।

काँपे कर पेल धिरे सब नाड ।। बले नख टूट चले बोहो जाड़ ।।३९४।।
आधीपासून हात कापू लागतात आणि मानेची नाड(नस)वाकडी होवून मुडू(वळू)लागते आणि नख टूट(पूर्ण भरलेला)चालु लागतो. ।।३९४।।

चखे बोहो साव अमीरस मांय ।। खटो रस सांव निसोदिन खाय ।।३९५।।
आणि आत खुपसे स्वाद चाखु लागतो आहे आणि षट रस(सहा त-हेच्या रसाचा स्वाद)

रात्रं–दिवस येत असतो. ।।३९५।।

**बंधे मन धीर उमंगे बेराग ।। घड़ी येक धीर तजुं पल जाग ।।३९६।।**

आणि मन धीर बांधला जातो आणि वैराग्य उठते आहे.घरी भर धीर जागृत होण्याचे फळ,क्षणात सोडून देतो. ।।३९६।।

**उठे मल जोर हिरदे अस्थान ।। चले द्रिग नीर नेणा मध जान ।।३९७।।**

तेथे हृदय स्थानान जोराने उठतो आणि डोळ्यांच्या रस्त्याने पाणी चालु लागते. ।।३९७।।

**हीलोला खाय हँसे कब रोय ।। इसा बोहो चाव हिरदे हर होय ।।३९८।।**

कधी लहर खातो आहे आणि कधी हसतो आहे आणि कधी रडतो आहे.याप्रकारे हृदयापासून हृदयात भरपूर तऱ्हेचे चरीत्र होतात. ।।३९८।।

**गहे सो मून कबु बक वाद ।। करे बोहो रंग तजे सो स्वाद ।।३९९।।**

कधी मौन धारण करतो आहे आणि कधी बकवाद(  )करतो आणि खुप तऱ्हेचे रंग करतो आणि सर्व स्वाद सोडून देतो. ।।३९९।।

**उमग्यो इन्द्र हिरदे उर माय ।। लागो झड़ आव उघाडे नाय ।।४००।।**

हृदयात इद्रं(मन)उमंग करुन जोराने आला येऊन झडी(भजनची झडी उघडत नाही). ।।४००।।

**बरसे कण बूंद ररो मंमंकार ।। धिनो सत्त स्याम उपावण हार ।।४०१।।**

आणि कणाचे छीटे(सिंतोडे)पडू लागले म्हणजे रामनामाची झडी लागून गेली.सतस्वामी तुम्ही धन्य आहात कि हे उत्पन्न केले. ।।४०१।।

**कियो भव भेव किमे करतार ।। रटे मुख नाँव चले उरधार ।।४०२।।**

या भवसागरात भेद कर्तार आपण कसे बनवले?की बघा मुखाने रामनामाचे रटण केले. ।।४०२।।

**बंधी लिव डोर इसी उर माय ।। अरट गल माल धोरि जल जाय ।।४०३।।**

आणि हृदयात धार बांधली गेली.(रामनामाचे रटन मुखाने केले आणि हृदयात शब्द कसा आला?) ।।४०३।।

**।। अथ बेली ग्रंथ अपूर्ण ।।**

।। अपूर्ण ।।

।। याच्या पुढील (२०३) श्लोक चवथ्या भागात करुन लिहिण्याचा विचार आहे. ।।